दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बीड रविवार,दि.२७ऑक्टोबर २०२४ |वर्षे४रे |अंक८४वा |पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या निवडणुकीत जागावाटप , कुठली जागा कुणाला सुटणार, उमेदवारांची यादी याची जशी चर्चा सुरू आहे तशीच चर्चा सुरू आहे जरांगे कोणाला पाठिंबा देणारे याची, त्यामुळे सगळेच पक्ष जरांगे यांचा पाठिंबा कसा मिळेल यासाठी मोर्चे बांधणी करताना दिसत आहेत.मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणूक लढण्याच्या घोषणेची सर्वच पक्षांनी धास्ती घेतली होती. निवडणूक लढताना तडजोड करावी लागेल हे जरांगे यांचं वाक्य राजकीय पक्षांच्या आशा प्रफुल्लित करणार ठरलं. जरांगेंच्या या वक्तव्यानंतर त्यांच्या दरवाजात राजकीय नेत्यांची रांग लागलीय. खास करून शिवसेना नेत्यांच्या तर भेटींचं सत्रच सुरू झालंय. गेल्या महिन्याभरात उदय सामंत किमान चार वेळा जरांगे यांना भेटले आणि आता आचारसंहितेतही भल्या पहाटे जरांगे यांची भेट घेतली.

# पाटलांच्या निर्णयामुळे सर्वच प्रस्थापिताच्या झोपा उडाल्या

### मनोज जरांगे पाटील उमेदवार देणार की पाडणार

### निवडणूक लढण्याच्या घोषणेची पक्षांनी घेतली धास्ती

### जरांगे पाटील काय भूमिका घेणार राज्याचे लक्ष!

### राजकीय नेते पाटलांचे उंबरठ्यावर माथा टेकवू लागले

जरांगे जुने मित्र असल्याचं सामंत सांगू लागलेत.उदय सामंत ही भेट राजकीय नसल्याचं सांगत असले तरीही दुसरीकडे आमची भूमिका जरांगे त्यांच्यासमोर मांडतो,आता जरांगे यांनी पाठिंबा द्यायचा की नाही? हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे असं शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी म्हटलंय. सत्ताधारी नेत्यांप्रमाणंच तिस-या आघाडीचे नेतेही जरांगे यांच्या भेटीला येतायेत. महाशक्तीकडून स्वराज पक्षाचे प्रमुख संभाजीराजे यांनी जरांगे यांची भेट घेतलीय. स्वराज्य पक्षाकडून उमेदवारांना रिंगणात उतरवा,अशी मागणी संभाजीराजेंनी यावेळी केलीय.भारतीय बौद्ध महासंघाचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर यांनीही जरांगे यांची भेट घेतलीय. मुराठा, मुस्लिम आणि दलित यांची मोट बांधावी. राखीव आणि खुल्या जागांवर एकमेकेकांना पाठिंबा देण्याची ऑफर राजरत्न आंबेडकरांनी दिलीय. जरांगेंचा पाठिंबा मिळवायचा किंवा जरांगेंचे उमेदवार निवडून येतील त्यांचा पाठिंबा घेण्याची काही पक्षांची रणनिती आहे. त्यामुळं जरांगेकडं संकट म्हणून पाहण्याऐवजी काही राजकीय पक्ष संधी म्हणून पाहत असल्याची चर्चा मराठवाड्यात रंगलीय. लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टरचा मोठा फटका महायुतीला बसला होता. त्यामुळे विधानसभेत महायुतीतले नेते कोणतीही रिस्क घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. गेल्या महिनाभरात उदय सामंत यांनी किमान चार वेळा जरांगे यांची भेट घेतलीय. आता आजही पहाटेच्या वेळी मंत्री उदय सामंत जरांगेंच्या भेटीला आलेत. ही भेट राजकीय नव्हती असं सामंत यांनी सांगितलं.

### जरांगेचा पाठिंबा घेण्यासाठी राजकीय पक्षांची धावाधाव

मनोज जरांगे यांनी निवडणूक लढण्याची घोषणा केली आणि त्याची सर्वच पक्षांनी धास्ती घेतली होती, मात्र निवडणूक कुणा एका जातीच्या भरोशावर लढता येणार नाही कुठेतरी तडजोड करावी लागेल हे जरांगे यांचा वाक्य राजकीय पक्षांच्या आशा प्रफुल्लित करणार ठरल आहे आणि त्यानंतर जरागे यांच्याकडे भेटीचा ओघ ही वाढला आहे.. खास करून शिंदेसनेकडून तर भेटींचं सत्रच सुरू आहे असं म्हणावं लागेल गेल्या महिन्याभरात उदय सामंत किमान चार वेळा जरांगे यांना भेटले आणि आता आचारसंहितेतही भल्या पहाटे जरांगे यांची भेट घेतली , माझा मित्र आहे म्हणून भेटायला आलो होतो विचारपूस करायला आलो होतो राजकीय नाही असे ते सांगताय, तर दुसरीकडे आम्ही पक्ष म्हणून आमची भूमिका जरांगे यांच्या कडे मांडतो आणि त्यांनी पाठिंबा दिला तर तो कुणाला नकोय असं संजय शिरसाठ म्हणाले त्यामुळे दोन्ही नेत्यांची ही वेगवेगळी वाक्य काहीतरी शिजतय आहे हे सांगायला पुरेशी आहेत.

# येवल्यात शरद पवारांची मोठी खेळी!

## पडघम:भुजबळांविरोधात दिले मराठा कार्ड

नाशिक/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील सर्वच घटक पक्षांकडून अनेक मतदारसंघात आता आपल्या उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. येवला मतदारसंघ सध्या चांगलाच चर्चेत आहे. येवला हा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात पुन्हा एकदा छगन भुजबळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या पहिल्याच यादीमध्ये या मतदारसंघातून भुजबळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर छगन भुजबळ यांच्याविरोधात महाविकास आघाडी कोणाला उमेदवारी देणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती.अखेर येवल्यामधून महाविकास आघाडीनं आपला उमेदवार जाहीर केला आहे.राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून आपल्या उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये येवला मतदारसंघाचा देखील समावेश आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून



येवल्यामधून मणिकराव शिंदे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता या मतदारसंघामध्ये शिंदे आणि भुजबळ यांच्यामध्ये काटे की टक्कर होण्याची शक्यता आहे.

दरम्यान मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्यात मोठा लढा उभारला. जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिलं, मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे अशी जरांगे पाटील यांची

# राजेश देशमुखांचा भाजपाला झटका

## राजकीय:भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा दिला राजीनामा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुका व परिसरातील सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. आणि सर्वसामान्यांची कामे होत नसल्याने आपण भारतीय जनता पार्टीच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे राजेश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी संधी दिल्यास परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास आपण इच्छुक असल्याचेही ते म्हणाले.

राजेश देशमुख यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी बोलताना ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्यांनी



नेहमीच पंकजाताई मुंडे यांच्यासारख्या सक्षम ओबीसी नेत्यांना डावलण्याचे काम केले आहे.त्यामुळे आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांचे कामे होत नव्हती. बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ. प्रीतम ताई मुंडे यांच्या समवेत आपण प्रामाणिकपणे काम केले. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांचे तीन वेळा भेट घेतली. तसेच मतदारसंघातील सर्व माहिती त्यांना देण्यात आली. तसेच धनगर, मराठा, बहुजन समाजाला पवार साहेबांनी आता संधी द्यावी अशी ही विनंती करण्यात आली. माझा जन्मच पुरोगामी पक्षात झाला आहे. त्यामुळे परत एकदा मी राष्ट्रवादी काँग्रेसकडे वळालो आहे. परळी शहरात परिस्थिती कोणत्या दिशेने चाललेली आहे हे सर्वांना माहीत आहे. परळीत सर्वांना सुखाने नांदता आले पाहिजे हीच माफक अपेक्षा आहे. बीड जिल्ह्यातून अनेक नेते आणि कार्यकर्ते भारतीय

# पिसाळलेल्या कुत्र्याचा ४० जणांना चावा

## निर्णय: पालिका कर्मचाऱ्यांनी कुत्र्याचा केला खात्मा

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

एकीकडे महाराष्ट्रात विधानसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरू असून दुसरीकडे मात्र आज परळी शहरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने चक्क ४० जणांना चावा घेतला आहे.कुत्रे चावलेल्या सर्वांनी परळी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी धाव घेतली.


याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील वैद्यनाथ मंदिर परिसरात आज दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळ पासून वृत लिही पर्यंत एका पिसाळलेल्या कुत्राने दिसेल त्याला चावा घेतल्याची घटना घडली आहे. चावा घेतलेल्या नागरिकांनी तातडीने परळी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेऊन उपचार घेतल्याचे समजते. दरम्यान या घटनेने परळी शहरात नागरिकांत भितीचे वातावरण निर्माण झाले होते. परळी नगर परिषदेने व प्रशासनाने या पिसाळलेल्या कुत्र्याचा खात्मा करून त्वरित बंदोबस्त केल्याप्रकरणी नगर परिषद च्या कर्मचारी अधिकाऱ्यांचे कौतुक केलं जात आहे

# नवविवाहितेवर सामूहिक अत्याचार

## घटना: व्हिडीओ व्हायरल करण्याची दिली धमकी

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

नवीन लग्न झाल्यानंतर नवऱ्याबरोबर मंदिरात आणि तिथून पुढे फिरायला गेलेल्या एका महिलेवर पाच जणांनी सामूहिक बलात्कार करण्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मध्य प्रदेशच्या रेवा जिल्ह्यात हा प्रसंग घडला असल्याचे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. सदर दाम्पत्य २१ ऑक्टोबर रोजी दुचाकीवरून रेवा येथील एका मंदिरात आले होते. तिथून पुढे काही अंतरावर



असलेल्या एका स्पॉटवर ते भटकंती करायला गेले. तिथेच आरोपी पार्टी करत होते. आरोपींनी आधी दाम्पत्याशी ओळख केली. त्यानंतर त्यांनी नवऱ्याला मारहाण करत पत्नीपासून वेगळे केले आणि मग सामूहिक बलात्कार केला, अशी माहिती रेवाचे पोलीस अधीक्षक विवेक सिंह यांनी दिली.हे कृत्य करत असताना आरोपींनी सदर नवविवाहितेचा व्हिडीओही बनवला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जर या प्रकाराची कुठे वाच्यता केली तर सदर व्हिडीओ व्हायरल करू, अशी धमकी दिल्याचे पीडितेने जबाबात म्हटले आहे. या धमकीमुळे पीडित दाम्पत्य पुढे यायला घाबरत होते. मात्र दुसर्या दिवशी म्हणजे २२ ऑक्टोबर रोजी त्यांनी पोलीस ठाण्यात येऊन एफआयआर दाखल केला. पीडितेने सांगितल्याप्रमाणे घटनास्थळी चार ते पाच आरोपी होते. मात्र आमच्या तपासात त्याहून अधिक लोक या गुन्ह्यात सहभागी असल्याचा संशय आहे. काही लोकांनी या आरोपींना मदत केली होती, अशी

## पडघम | धनंजय मुंडे :स्थानिकांना मिळणार रोजगार

# परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी प्रकल्प

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीला दिलेल्या विश्वासामुळे कंपनीने त्यांच्या परळी येथील सिमेंट ग्रायडिंग युनिटच्या उत्पादन क्षमतेमध्ये पाच पटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून याठिकाणी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक कंपनीने दोन टप्प्यात करणार असल्याचे जाहीर केले आहे. या उद्योगामुळे अल्ट्राटेक या जागतिक दर्जाच्या कंपनीचे अतिरिक्त युनिट परळीत उभा राहणार असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांचे शिष्टमंडळ



परळी येथे धनंजय मुंडे यांच्या भेटीला आले होते, यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनीने क्षमता वाढीसाठी दि.२४ रोजी संपन्न झालेली पर्यावरण जनसुनावणी पार पडल्यानंतर परळी येथील युनिट साठी दोन टप्प्यांत अतिरिक्त ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली असल्याचे कंपनीच्या वतीने कळविण्यात आले आहे.या आधी देखील धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैजनाथ शहरालगत इंडिया सिमेंट कंपनीने सदरील युनिट सुरू केले होते. त्याद्वारे देखील मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे. त्यानंतर आता जागतिक दर्जा प्राप्त असलेली अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या या मोठ्या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात विविध इतर पूरक उद्योगांना चालना मिळणार असून स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार आहे. या गुंतवणुकीसाठी मान्यता दिल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीच्या संचालक मंडळाचे आभार मानले आहेत.

# वंचितचे प्रतीक अपक्ष निवडणूक लढविणार!

## रणधुमाळी:ऐनवेळी वंचितने उमेदवारी नाकारली!

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

वचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रतीक बारसे आगामी नगर शहर विधानसभा अपक्ष लढणार आहेत मागील नगर शहर विधानसभेला प्रतिक बारसे यांना वंचित बहुजन आघाडीने अधिकृत उमेदवारी देण्याची जाहीर केले होते ऐनवेळी पक्षाने उमेदवारी नाकारली

प्रतीक बारसे वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष असून बाळासाहेब आंबेडकरांचे कट्टर समर्थक मानले जातात त्यांना नगर शहर मतदार सघातुन मागील वेळेस उमेदवारी जाहीर होऊन ही अंतर्गत गटबाजीतून त्याचे तिकीट कापणयात आले होते आताच झालेल्या लोकसभेला त्यानी उमेदवारीची ही मागणी केली होती सामाजिक




राजकीय कार्यातून बारसे यानी मोठा जनसंपर्क निर्माण केला आहे त्यामुळे त्यांच्या अपक्ष उमेदवारीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे ते ख्रिश्चन

पान २ वर...

## राज्याची सत्ता कोणाला?

राज्यात विधानसभेची निवडणूक कधी होणार याची प्रतीक्षा संपुष्टात आली. नवीन विधानसभेसाठी मतदान कधी होणार याची संपूर्ण राज्याला उत्सुकता होती. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला आणि येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याचे स्पष्ट केले. राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक होणार असून ९ कोटी ६३ लाख मतदार आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील. कोण आमदार विधानसभेवर निवडून द्यायचा व राज्याच्या किल्ल्या कोणाच्या हाती द्यायच्या याचा निर्णय मतदारांनी करायचा आहे. देशात दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा निकराचा राजकीय संघर्ष या निवडणुकीत बघायला मिळणार आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी परीक्षा आहे.

महायुतीचे सरकार वाट्टेल ते करून त्यांना पुन्हा सत्तेवर आणायचे आहे. महायुतीपुढे महाविकास आघाडीचे यावेळी जबर आव्हान आहे. ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या दोन मोठ्या पक्षांत मोठी फूट पडल्यानंतर ते दोन्ही पक्ष हतबल होतील, संपतील किंवा दुर्बल होतील असे भाजपाला वाटले होते. प्रत्यक्षात लोकसभा निवडणुकीत मतदारांनी महाआघाडीला ४८ पैकी ३१ जागा दिल्या, तर महायुतीचे केवळ १७ खासदार निवडून आले. लोकसभा निवडणुकीत सर्वात जास्त नुकसान भाजपाचे झाले, सन २०१९ मध्ये भाजपाचे २३ खासदार होते, यंदा केवळ ९ खासदार निवडून आले. पराभवाची कसर भरून काढणे व महाआघाडीपेक्षा जास्त आमदार निवडून आणणे हे भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तिन्ही पक्षांपुढे मोठे आव्हान आहे. म्हणूनच महायुतीपुढे शरद पवार, ठाकरे नि राहुल गांधी (नाना पटोले नि बाळासाहेब थोरात) असे जंगी आव्हान आहे. महिनाभरात महायुती सरकारने सवलती नि मोफत योजनांची समाजघटकांवर खैरात केली, त्याचा खराच किती लाभ होतो हे निकालानंतरच समजेल.

महाआघाडीच्या डावपेचांपुढे महायुतीला किंचितही गाफिल राहून चालणार नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे, तसेच प्रकाश आंबेडकर, राजू शेट्टी, लक्ष्मण हाके, मनोज जरांगे, बच्चू कडू आदी नेते किती मते खेचून घेतात, त्यावरही राजकीय समीकरण ठरणार आहे. सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना व भाजपाची युती होती. तेव्हा भाजपाने १०५ व शिवसेनेने ५६ जागा जिंकल्या होत्या. दुसऱ्या बाजूला काँग्रेसचे ४४, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ५४ आमदार निवडून आले होते. पाच वर्षांत महाराष्ट्रात एवढ्या उलथापालथी झाल्या की, मतदार कमालीचे गोंधळले आहेत. आपण कोणाला कोणत्या पक्षाचे आमदार म्हणून निवडून देतो आणि कोणाच्या विरोधात निवडून देतो आणि नंतर हेच आमदार कुठे जातात, काय करतात हे पाहिल्यावर महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचका झाला आहे, अशी भावना मतदारांची झाली आहे. निवडून येण्यासाठी मतदारांचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे. निवडून दिल्यानंतर आमदार सत्ता आणि प्रलोभनाच्या मागे धावणारच नाही, याची आज शाश्वती राजकीय पक्षांना आणि मतदारांनाही वाटत नाही. पक्षांच्या फोडाफोडीवर सत्तेचे राजकारण किती वाईट पद्धतीने खेळले जाते याचा अनुभव महाराष्ट्राने गेल्या पाच वर्षांत घेतला आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राने तीन मुख्यमंत्री बघितले. सुरुवातीला देवेंद्र फडणवीस व अजित पवार ही जोडी बघितली, ती ८० तासच टिकली, नंतर उद्धव ठाकरे व अजित पवार ही जोडी अडीच वर्षे अनुभवली. त्यानंतर एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवारांना महाराष्ट्राने अनुभवले. महाराष्ट्राच्या रणसंग्रामात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे भाजपासाठी सर्वस्व पणाला लावणार, हे निश्चित आहे. पण एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या पक्षासाठीही भाजपाला आपली यंत्रणा राबवावी लागणार आहे. आमची त्यांना मते मिळाली. पण त्यांची मते आमच्याकडे आली नाहीत, असा रडीचा डाव नंतर मांडून उपयोग होणार नाही.

# वंचित वगळता सर्वच पक्षात घराणेशाहीचे!

## प्रकाश आंबेडकर: जागरूक मतदार म्हणून तुम्ही ठरवा कुणाच्या पाठीशी


मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. अशातच सर्व राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. या पक्षांच्या उमेदवार याद्या पाहिल्या तर यामध्ये घराणेशाही आणि कुटुंबशाहीला प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. मात्र, या सगळ्याला वंचित बहुजन आघाडी हा पक्ष अपवाद असल्याचे सुद्धा दिसत आहे. त्यामुळे एक जागरूक मतदार आणि कार्यकर्ते म्हणून या निवडणुकीत तुम्ही कुणाच्या पाठीशी राहणार हे ठरवण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी भाजपने ९९ जणांची नावे जाहीर केली. भाजपच्या या उमेदवार यादीतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनेक नवीन चेहरे असले तरी यात राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या अनेकांना विधानसभेचे तिकीट देण्यात आले आहे. विनोद शेलार जे आशिष शेलार यांचे भाऊ आहेत त्यांना भाजपने मालाड पश्चिममधून उमेदवारी दिली आहे. भाजप नेते अशोक चव्हाण यांची मुलगी श्रीजया चव्हाण यांना भोकर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड, रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे, माजी खासदार हरिभाऊ जावळे यांचे पुत्र अमोल जावळे, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप, प्रकाश आवाडे यांचे पुत्र राहुल आवाडे, बबनराव पाचपुते यांच्या पत्नी प्रतिभा पाचपुते, धनंजय महाडीक यांचे पुतणे अमल महाडीक यांच्यासह अनेक नेत्यांच्या नातेवाईकांना भाजपने उमेदवारी दिली आहे. शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनीही भाजपचाच कित्ता गिरवल्याचे दिसत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उध्दव ठाकरे आणि काँग्रेस यांनीही घराणेशाही मजबूत करायचं कार्य केले आहे. बारामती मतदार संघात युगेंद्र पवार यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी दिली आहे. ते अजित पवार यांचे सख्खे पुतणे आहेत. तसेच कर्जत जामखेडमधून रोहित पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ते शरद पवार यांचे नातू आहेत. वरळीतून उध्दव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांना ठाकरे गटातून उमेदवारी देण्यात आली, तर त्यांचेच मावस भाऊ वरुण सरदेसाई यांनाही वांद्रे पश्चिममधून उमेदवारी दिली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी सुद्धा याला अपवाद नसल्याचे दिसत आहे.

ंचित बहुजन आघाडीने मात्र समाजातील सर्व घटकांना उमेदवारी देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत आहे. घराणेशाही आणि कुटूंबशाही यांना छेद देत वंचित समूहांना उमेदवारी देत वंचितने एक आदर्श समोर ठेवल्याचे बोलले जात आहे. रावेरमधून तृतीयपंथी समुदायातील शमिभा पाटील यांना उमेदवारी देत वंचित बहुजन आघाडीने लोकशाहीवादी पक्ष असल्याचे दाखवून दिले आहे.घराणेशाही आणि कुटुंबशाही यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मतदार घराणेशाहीच्या बाजूने मतदान करणार का ? हे पाहावं लागणार आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांनी स्वीकारलेल्या घराणेशाहीमुळे मतदारांमधून संताप व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता वंचित बहुजन आघाडीसाठी आशादायक चित्र निर्माण झाल्याचे दिसत आहे. लोकसभा निवडणुकीनंतर वंचित बहुजन



आघाडीने पुन्हा जोर धरल्याचे सुद्धा पाहायला मिळत आहे. त्यामुळे राजकीय समीकरण बदलणार का ? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# जर्मनीला भारतीय कामगारांची आवश्यकता का?

## देशविदेश:भारतीयांसाठी जर्मनीने वाढवला 'व्हिसा कोटा'

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

जर्मनीत सध्या वयोवृद्धांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने कामगारांची कमतरता निर्माण झाली आहे. जर्मनीला कुशल कामगार मिळावे, यासाठी जर्मन चॅन्सेलर स्कोल्झ ओलाफ यांनी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कामगार व मजुरांची कमतरता भरून काढण्यासाठी जर्मनीने भारतीय नागरिकांसाठी वार्षिक व्हिसा कोटा २०,००० हून ९०,००० हजारांपर्यंत वाढवला आहे. यापूर्वी जर्मनीत दरवर्षी फक्त २०,००० हजार भारतीय नागरिकांना व्हिसा दिला जात होता. आता ९०,००० भारतीयांना दरवर्षी व्हिसा देण्याचा निर्णय जर्मनीने घेतला आहे. त्यामुळे आता भारतीय तरुणांना मोठ्या संख्येने जर्मनीत रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच जर्मन व्हिसाचा प्रतिक्षा कालावधीदेखील कमी करण्यात आला आहे.जर्मनीत ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत असल्याने तिथे कामगारांचा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी जर्मनीला तरुण कामगारांची आवश्यकता आहे. जर्मनीत २०१४ मध्ये एकूण लोकसंख्येच्या २७ टक्के लोकसंख्या ही ६० वर्षांहून अधिक वय असलेल्या



नागरिकांची होती. २०३० पर्यंत जर्मनीतील ३५ टक्के लोकसंख्या ही ६० वर्षांहून अधिक वयोमान असलेल्या नागरिकांची होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे आतापासूनच जर्मन चॅन्सेलर ओलाफ स्कोल्झ यांच्याकडून या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पाऊलं उचलली जात आहेत.भारतातून जर्मनीत जाणाऱ्या कामगारांना मुख्यत: आभियांत्रिकी व आयटी क्षेत्रात रोजगाराच्या संधी असतील. तसेच रुग्णसेवा, ज्येष्ठ नागरिकांची सेवा, ट्रक चालक, बालसंगोपन या क्षेत्रांमध्ये देखील रोजगार उपलब्ध होणार आहेत. जर्मनीच्या विदेश मंत्री ॲनालेना बेअरबॉक या देखील भारत दौऱ्यावर आल्या असून त्यांनी नवी दिल्लीत माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, भारतात कुशल कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आहेत. आम्हाला जर्मनीमध्ये कामगारांची आवश्यकता आहे. त्यामुळे जर्मनीने घेतलेल्या निर्णयाचा फायदा हा जर्मनीसह भारताला देखील होणार आहे. दरम्यान, जर्मन चॅन्सेलर ओलाफ स्कोल्झ हे मागील दोन वर्षात तिसऱ्यांदा भारत दौऱ्यावर आले आहेत.जर्मनीत शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. जर्मनीत शिक्षण घेणाऱ्या विदेशी विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक विद्यार्थी हे भारतीय आहेत, तर दुसऱ्या क्रमांकावर चीन आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात जर्मनीत ४९,४८३ भारतीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत यात १५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे जर्मन अकॅडमीक एक्सचेंज सर्व्हिसच्या अहवालातून समोर आले आहे.जर्मन चॅन्सेलर ओलाफ स्कोल्झ हे सध्या तीन दिवसीय भारत दौऱ्यावर आले आहेत. स्कोल्झ यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी जर्मनी व भारत या देशांमध्ये विविध करारांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. तसेच रशिया-युक्रेन संघर्ष, पश्चिम आशियातील स्थिती व इतर जागतिक समस्यांवर जर्मन चॅन्सेलर ओलाफ स्कोल्झ व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली.

# इस्रायलचा इराणवर हवाई हल्ला

## युद्ध: लष्करी तळांना लक्ष्य केले,

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

शनिवारी रात्री इस्रायलने इराणवर थेट हवाई हल्ला केला. १ ऑक्टोबर रोजी इराणने इस्रायलवर १८० क्षेपणास्त्र डागले होते. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून २६ दिवसांनंतर इस्रायलकडून सदर हल्ला केला गेल्याचे इस्रायल डिफेन्स फोर्सने एक्सवर पोस्ट करून सांगितले आहे. शनिवारी पहाटे इस्रायलने इराणमधील लष्करी तळांना लक्ष्य केले. यानंतर आता दोन्ही देशांमध्ये युद्ध भडकण्याची शक्यता वर्तविली जात आहे. इस्रायलने दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील १० लष्करी तळांना लक्ष्य केले गेले आहे. हा हल्ला फक्त लष्करी तळापुरताच मर्यादित होता. इतर ठिकाणी हल्ले झाले नाहीत, असा दावा इस्रायलने केला आहे. इराणचे या हल्ल्यात किती नुकसान झाले, याबाबतची



माहिती मात्र अद्याप मिळू शकलेली नाही.इराणच्या लष्कराने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, इराण आणि स्थानिक दहशतवादी संघटना ७ ऑक्टोबर २०२३ पासून इस्रायलवर चहुबाजूंनी हल्ला होत आहे. इराणच्या भूमीवरून तर इस्रायलवर थेट हल्ले झाले आहेत. जगातील इतर सार्वभौम देशांप्रमाणेच इस्रायललाही त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आहे. दरम्यान हे हल्ले कुठून, कसे करण्यात आले, याची मात्र कोणतीही माहिती दिली गेली नाही.

## पान एक वरून

**येवल्यात शरद पवारांची**

मागणी आहे, तर दुसरीकडे ओबीसी समाजाचा जरांगे पाटील यांच्या या मागणीला जोरदार विरोध आहे. त्यामुळे राज्यात सध्या आरक्षणाचा प्रश्न चांगलाच तापला आहे. भुजबळ हे ओबीसी नेते असून, जरांगे पाटलांच्या मागणीविरोधात ते सध्या ओबीसींची बाजू मांडताना दिसत आहेत. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊ नये असं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे सध्या भुजबळ हे जरांगे पाटलांच्या निशाण्यावर आहेत. त्यातच आता शरद पवार यांनी येवल्यामध्ये माणिकराव शिंदे यांना उमेदवारी दिली आहे, त्यामुळे या सर्व पार्श्वभूमीवर आता शरद पवार यांचं मराठा कार्ड यशस्वी होणार का? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**राजेश देशमुखांचा भाजपाला**

जनता पार्टीला सोडचिठ्ठी देत आहेत. त्यामुळे आगामी काळात भाजपा, बीड जिल्ह्यात शिल्लक राहते की नाही हा प्रश्न आहे असेही राजेश देशमुख म्हणाले. भारतीय जनता पार्टीच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवल्याचे ते म्हणाले. दरम्यान राजेश देशमुख यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून निवडणूक लढविण्याची इच्छा जाहीर केली आहे. त्यामुळे इच्छुकांच्या संख्येत वाढ झाली आहे. मात्र आता शरद पवार कोणाच्या गळ्यात उमेदवारी घालतात हे दोन दिवसात स्पष्ट होईल.

**नवविवाहितेवर सामूहिक**

शक्यता पोलीस अधीक्षकांनी व्यक्त केली. पाच अज्ञात आरोपींविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवविवाहित दाम्पत्याने रेवा येथील मंदिरात दर्शन घेतल्यानंतर तिथूनच दोन किलोमीटरवर असलेल्या एका सहलीच्या पॉईंटला भेट दिली होती. दरम्यान आरोपी या घटनेच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत होते. घटनास्थळावरून मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपी हे रेवा जिल्ह्यातीलच असल्याचा अंदाज व्यक्त केला गेला आहे.पीडितेने पोलिसांना सांगितले की, पाच आरोपींच्या हातावर आणि छातीवर टॅटू होते. या माहितीचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे.

**वंचितचे प्रतीक अपक्ष निवडणूक**

समाजाचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे त्यांना शहरातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहेमागील विधानसभाला प्रतिक बारसे यांचे तिकीट कापण्यात आल्यामुळे यावेळी त्यांनी सावध पवित्रा घेत अपक्ष अर्ज सोमवारी दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे सोमवारी सकाळी अकरा वाजता केडगाव इथून भव्य आशा रैलीने ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

## पान सहा वरून

**गेवराईत निवडणूक वातावरण**

सोबत समाजकार्य करत असणारे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांना उमेदवारी मिळेल अशी आशा होती यासाठी अनेक बंजारा समाजातील व इतर समाजातील महाराज मंडळी, नेते, सर्वसामान्य कार्यकर्ते पवारांकडे भेटायला गेले मागणी केली पण या मागणीला अपयश आल्याने कार्यकर्त्यांनी एकच सूर धरून दिनांक २६ ऑक्टोबर रोजी तालुक्यातील कार्यकर्ते एकत्र येत बैठक भरवली आणि अण्णासाहेब राठोड तुम्ही उमेदवारी अर्ज भरा आम्ही जीवाचे रान करू तुम्हाला आमदार करू माघार घेऊ नका अशी मागणी उपस्थित बैठकीमध्ये करण्यात आली. यावेळी या मागणीवर दोन दिवसात विचार करून आपल्याला निरोप कळवतो असे विचार तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी मांडले आता अण्णासाहेब राठोड काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**कडा येथे पोलिसांचे**

शनिवारी आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या नेतृत्वाखाली आष्टी , कडा , आंधळेवाडी आणि शिराळ या ठिकाणी पोलिसांचे पथसंचलन झाले . यावेळी आष्टी पोलीस ठाण्याच्या पोलिसांबरोबरच सीमा सुरक्षा दलाचे पोलीसही यामध्ये सहभागी झाले होते . ए पी आय विक्रांत हिंगे , विजय नरवाडे , पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे , आजीनाथ काकडे, सीमा सुरक्षा दलाचे पी एस आय रतन सिंग , रोहिताश कुमार यांच्यासह आष्टी पोलिस ठाण्याचे ३५ पोलिस व बीएसएफ ची ४४७ बटालियन अल्फा कंपनीचे जवान सहभागी झाले होते . कंपनी कमांडर एसी राम कुमार व आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथ संचलन झाले .

**पार्डीकर महाविद्यालयात**

बालाघाट डोंगररांगा हरित करणे हा हेतू असून सर्वांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड करावी तसेच फळांच्या बिया गोळा करून ग्रीन क्लबला जमा कराव्यात अशा पद्धतीचे आव्हान ग्रीन क्लबचे समन्वयक डॉ.जयदीप सोळुंके यांनी केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के .के. पाटील यांनी केला .याप्रसंगी बोलताना त्यांनी स्पर्धा परीक्षेचा तंत्र व मंत्र या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. जी व्ही गट्टी यांनी मांनले कार्यक्रमाच्या सुरुवातीला दयानंद झिंजुर्डे यांनी उजाड झाले डोंगर सारे उजाड झाला गाव एक तरी झाड लाव माणसा एक तरी झाड लाव हे गीत गाऊन उपस्थांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय फुलारी यांनी केले या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी असे एकूण ७० सदस्य उपस्थित होते.

**जरांगे पाटलांना भेटल्याने**

आ.लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवणार नाही अशी घोषणा केली त्यानंतर मतदार संघातील जनते मोठ्या प्रमाणात चल बीचल निर्माण झाली तर अनेक कार्यक्रते पदाधिकारी यांनी उपोषणांचा निर्णय घेतला होता त्यामुळे आ.लक्ष्मण पवार यांनी बैठक घेऊन सर्वाशी संवाद साधत आपली भुमीका व्यक्त केली होती त्यावर सर्वांनीच आण्णा तुम्ही निवडणूक लढवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली सर्वाच्या मताने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणुक लढणार असल्यांचे जाहीर केला त्यामुळे मतदारसंघातील जनतेसह कार्यक्रत्यांनी निर्णयांचे स्वागत केले आहे

**खेवरे किंवा कदमांनी विधानसभा**

कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम केले यापुढील काळात विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांचे संघटन करून तालुक्यातील येणाऱ्या सर्व निवडणुका विकास मंडळाच्या नावावर लढवल्या जातील यासाठी सर्व विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एक संघ राहावे असे आवाहन त्यांनी केले

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख पै रावसाहेब खेवरे म्हणाले की मी जरी सेनेचा जिल्हाध्यक्ष असलो तरी माझा राजकीय जन्म विकास मंडळामुळे आहे त्यामुळे विकास मंडळ म्हणून मी केव्हाही आपल्या पाठीशी उभा राहील मा नगराध्यक्ष सत्यजित कदम माजी संचालक सत्यवान पवार डॉ जयंत कुलकर्णी आदींनी मनोगत व्यक्त केलेमेळाव्याला काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आढाव नानासाहेब कदम लखूनाना गाडे भाऊसाहेब गाडे डॉ संजय म्हसे राजेंद्र साबळे रमेश पवार शिवसेनेचे तालुकाप्रमुख देवेंद्र लांबे वसंतराव कोळसे ज्ञानदेव निमसे मंदार धुमाळ प्रतीक तनपुरे किरण बोरवके बाळासाहेब जाधव नितीन तनपुरे सोन्याबापू जगधने सुनील पवार विजय पवार संभाजी आढाव नानासाहेब आढाव गोपाल अग्रवाल आदी सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महाराष्ट्राला संत परंपरेचा**

महासंघाचे दशरथ पिसाळ सुनील महाराज पारगावकर आदिनाथ महाराज देवकते इत्यादी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सर्वसामान्यापर्यंत जनजागृती करण्यासाठी विभाग न्याह्या दौरे करण्यात येणार असून सांप्रदायातील सर्व कीर्तनकार परवचन काळ रामायणाचार्य भागवताचार्य यांनी कार्यक्रमातून जनजागृती करावी अशी कळकळीची विनंती करण्यात आली आहे.

**दिंद्रुडमध्ये निरंकारी**

करून घेतले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी दिंद्रुड ब्रांच मुखी शंकर यादव, सेवादल शिक्षक अमर जाधव, शिवहार शिरसे यांच्यासह आदी सेवादलाच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेऊन रक्तदान शिबिर यशस्वी केले.

**विधानसभा निवडणुकांसाठी**

हद्दीतील ५२ गावांपैकी फरदापुर जिल्हा परिषद गटातील १२ गावे ही सिल्लोड विधानसभा मतदार संघात असून ती फरदापुर पोलिसांच्या हद्दीत आहे सोयगाव शहरापासून कवली गावापर्यंत ही १४ गावापासून सोयगाव पोलिसांची हद्द सुरू होते मात्र मतदार संघ सिल्लोड आहे तर उमर विहिरे ते मोहलाई ही हद्दीतील २६ गावे सोयगाव पोलिसांच्या हद्दीत आहे ते कन्नड मतदार संघात आहे त्यामुळे सोयगाव पोलिसांना दोन मतदार संघात बंदोबस्त करावा लागणार आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# दंगल चित्रपटाने दोन हजार कोटी कमावले, पण फोगट कुटुंबाला फक्त एक कोटी दिले!

## बबिता फोगटने केला खुलासा

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट अभिनेता आमिर खान याचा दंगल चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपर-डुपर हिट ठरला होता. या चित्रपटाने जगभरात २००० कोटीची कमाई केली. या चित्रपटामुळे फोगाट कुटुंबालाही प्रसिद्धी मिळाली. दंगल चित्रपटात महावीर फोगट आणि त्यांच्या मुली गीता, बबिता यांची कहाणी दाखवण्यात आली आहे. या चित्रपटाबाबत आता बबिता फोगटने मोठा खुलासा केला आहे. दंगल चित्रपटाने २००० कोटी कमावले, पण फोगाट कुटुंबाला फक्त एक कोटी रुपये देण्यात आले होते, असा खुलासा बबिता फोगटने केला आहे.



भारताची माजी कुस्तीपटू बबिता फोगटने कुस्तीतून निवृत्ती घेत राजकारणात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता बबिता फोगट हिने दंगल चित्रपटाबाबत मोठा खुलासा केला आहे.

# दोन महिला खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय संघात केले पदार्पण

## महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

वृत्तसंस्था...

**अहमदाबाद :** वुमन्स टिम इंडिया आणि वुमन्स न्यूझीलंडमध्ये तीन सामन्यांची वन डे मालिका सुरू झाली आहे. या मालिकेमधील पहिला वन डे सामना नरेंद्र मोदी स्टेडियन अहमदाबादमध्ये हा सामना पार पडत असताना या सामन्यात सांगलीकर स्मृती मंधानाकडे टिम इंडियाची धुरा सोपवण्यात आली आहे. स्मृतीच्या कर्णधारपदाखाली महाराष्ट्राच्या दोन खेळाडूंनी पदार्पण केले आहे.

न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात महाराष्ट्राच्या तेजस



हसबनीस आणि सायमा ठाकोर या दोघींनी भारतीय संघाकडून पदार्पण केले आहे. भारताची स्टार खेळाडू जेमिमाह रॉड्रिग्सने दोघींनी कॅप दिली. सायमा ठाकरे ही वेगवान गोलंदाज तर तेजल हसबनीस फलंदाज आहे. वुमन्स प्रीमीयर लीगमध्ये सायमा ठाकोर हिने सहा सामने खेळले असून त्यामध्ये तीन विकेट घेतल्या आहेत.

# टिम इंडियाने या तीन खेळाडूंचा दिला बळी!

वृत्तसंस्था

**पुणेः** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील ३ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना आज (२४ ऑक्टोबर) गुरुवारपासून पुण्यात खेळला जात आहे. या कसोटीसाठी केएल राहुलला भारतीय प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळालेले नाही. तेव्हापासून केएल राहुलच्या कारकिर्दीवर सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

सोशल मीडियावर क्रिकेट चाहत्यांचे म्हणणे आहे की, आता केएल राहुलसाठी भारतीय संघात पुनरागमन करणे सोपे

### केएल राहुलचे करिअर घडवण्याचा खटाटोप



जाणार नाही. भारतीय कसोटीत केएल राहुलला चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे आणि मयंक अग्रवाल यांसारख्या अनुभवी फलंदाजांपेक्षा अधिक प्राधान्य देण्यात आले होते; परंतु हा फलंदाज फायदा उठवू शकला नाही.

# सोलापूरच्या मुलाकडून विराट कोहलीची कमकुवत बाजू उघड

## व्हिडिओ व्हायरल

वृत्तसंस्था

**पुणेः** बंगळुरुत पहिल्या कसोटीत पराभव झाल्यानंतर आता पुणे टेस्टमध्ये टिम इंडियाकडून विजयाची अपेक्षा आहे. विराट कोहलीची बॅट चालणे आवश्यक आहे, तरच टिम इंडियाच्या अपेक्षा पूर्ण होऊ शकतील. पुण्याच्या नेट्समध्ये जे पाहायला मिळाले, त्यामुळे अपेक्षा तशा कमीच आहेत. नदीम शेख नावाच्या एका नेट बॉलरने विराटची कमजोरी उघड केली. त्याला क्लीन बोल्ड केले.

नदीम शेख एक वेगवान गोलंदाज आहे. महाराष्ट्रातील



सोलापूर जिल्ह्यातून तो क्रिकेट खेळतो. शोएब अख्तर, ब्रेट ली, डेल स्टेन हे त्याचे आवडते वेगवान गोलंदाज आहेत. त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्याचा नदीमचा प्रयत्न आहे. नदीम स्वतःला भाग्यवान समजतो, कारण त्याला विराट कोहलीला बॉलिंग करण्याची संधी मिळाली. त्याने विराटची विकेटसुद्धा काढली.

# आशियात दशकानंतर द. आफ्रिकेचा कसोटी विजय

वृत्तसंस्था

**ढाकाः** दक्षिण आफ्रिका क्रिकेट टिम सध्या बांगलादेश दौऱ्यावर आहे. दक्षिण आफ्रिका विरुद्ध बांगलादेश यांच्यात २ सामन्यांची कसोटी मालिका खेळवण्यात येत आहे. दक्षिण आफ्रिकेने या मालिकेत विजयी सलामी दिली आहे. दक्षिण आफ्रिकेने विजयाने सुरुवात करत यजमानांना बॅकफुटवर ढकलले आहे. ढाका येथे खेळवण्यात आलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने बांगलादेशवर ७ विकेट्सने मात केली. दक्षिण आफ्रिकेसाठी हा विजय खास ठरला. दक्षिण आफ्रिकेने आशियात तब्बल १० वर्षांनी कसोटी सामना जिंकण्याची कामगिरी करून दाखवली आहे.

### बांगलादेशला घरात लोळवले



दक्षिण आफ्रिकेची यासह आशियात कसोटी विजयाची प्रतीक्षा अखेर संपली. दक्षिण आफ्रिकेला गेल्या ९ सामन्यांमध्ये आशियात पराभूत व्हावे लागले. मात्र, दक्षिण आफ्रिकेने ही पराभवाची साखळी तोडली आहे. दक्षिण आफ्रिकेने बांगलादेशला त्यांच्याच घरात तब्बल १६ वर्षांनंतर पराभूत केले आहे.

# अश्विनचा पुणे कसोटीत धमाका; नॅथन लायनला मागे टाकत रचला इतिहास

वृत्तसंस्था

**पुणेः** टिम इंडियाचा स्टार फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनाने आज गुरुवारी (दि. २४) इतिहास रचला. आर. अश्विन ऑस्ट्रेलियाचा दिग्गज फिरकीपटू नॅथन लायन याला मागे टाकून कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक बळी घेणारा सातवा गोलंदाज ठरला. पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या न्यूझीलंड विरुद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात ३८ वर्षीय अश्विनने तीन महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. अश्विनला आज नॅथन लायनच्या ५३० विकेट्सचा टप्पा पार करण्यासाठी तीन विकेट्सची गरज होती. हा टप्पा त्याने आश्चर्यकारक पद्धतीने गाठला. त्याने पहिल्याच षटकात न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथमला १५ धावांवर बाद केले. त्यानंतर अश्विनने विल यंगला



१८ धावांवर यष्टिरक्षक ऋषभ पंत करवी झेलबाद करून भारताला आणखी एक यश मिळवून दिले. त्याने तिसरी विकेट डेव्हन कॉनवेची घेतली. कॉनवेने ७६ धावांची खेळी केली. तो पंत करवी झेलबाद झाला..आजच्या महत्त्वपूर्ण ३ विकेट्ससह अश्विनने एकूण ५३१ विकेट्स पूर्ण केल्या आहेत. यामुळे त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ५३० विकेट्स घेणाऱ्या नॅथन लायन मागे टाकले आहे.



# टिम इंडिया २४३ धावांनी पिछाडीवर

## पहिल्या दिवशी एकूण ११ विकेट्स

## वॉशिंग्टन सुंदर चमकला, भारताच्या १ बाद १६ धावा

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणेः** पुणे कसोटीच्या पहिल्या दिवशी पाहुण्या न्यूझीलंड संघाच्या फलंदाजांनी भारतीय फिरकीपटूंसमोर लोटांगण घातले. वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक सात आणि आर. अश्विनने तीन विकेट घेऊन किवींचा पहिला डाव २५९ धावांत संपुष्टात आणला. प्रत्युत्तरात पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत यजमान टिम इंडियाने एक गडी गमावून १६ धावा केल्या आहेत. सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि शुभमन गिल यांनी सावध खेळ करत उर्वरित षटके खेळून काढली. टिम इंडियाने पहिल्या दिवसअखेर १ बाद १६ अशी स्थिती असताना टीम इंडिया २४३ धावांनी पिछाडीवर आहे.

### वॉशिंग्टन सुंदरने न्यूझीलंडच्या डावाला लावला सुरुंग

दरम्यान, आज (२४ ऑक्टोबर) सकाळी नाणेफेक जिंकून न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडच्या डावाची सुरुवात लॅथम आणि कॉनवे यांनी केली. मात्र, आठव्या शतकात लॅथमला आश्विनने बाद करत टिम इंडियाला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर जम बसलेल्या विल यंगलासुद्धा बाद करत दुसरे यश मिळवून दिले. कॉनवे आणि रचिन यांनी शानदार अर्धशतकी खेळी केली. मात्र, त्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने न्यूझीलंडच्या डावाला सुरुंग लावला. ३ बाद १९७ अशा सुस्थितीत न्युझीलंड दिसत असताना वॉशिंग्टन सुंदरच्या माऱ्यासमोर न्यूझीलंडचा डाव अवघ्या २५९ धावांमध्ये आटोपला.


# अचूक टप्पा कोणता असू शकतो, यावर केले लक्ष केंद्रीत

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** वॉशिंग्टन सुंदरने पहिल्या दिवशी सात विकेट्स घेतल्या आणि भारताच्या विजयाचा पाचा रचला, कारण भारताला पहिल्याच दिवशी न्यूझीलंडला २५९ धावांत ऑल आऊट करता आले, पण सुंदरला पहिल्या कसोटीत संधी दिली नव्हती, पण दुसऱ्या कसोटीत तो संघात आला आणि त्याने सामन्याची दिशाच बदलली.

वॉशिंग्टन सुंदर सात विकेट्स मिळाल्यावर म्हणाला की, माझ्याबाबतीत जे काही घडले,

### सात विकेट्स घेतल्यानंतर वॉशिंग्टन सुंदरची माहिती



त्यामध्ये देवाची महत्त्वाची भूमिका आहे. पहिल्या दिवशी मी अचूक आणि भेदक मारा करू शकलो. त्याचबरोबर चांगली गोलंदाजी करत भारतीय संघाच्या उपयोगी पडलो.

# युनियन बँकेवर वित्तीय गुप्तचर यंत्रणेकडून 54 लाखांचा दंड

## मुंबईतील शाखेतील संशयास्पद व्यवहारांच्या देखरेखीत अपयशाचा ठपका

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** मुंबईतील एका शाखेत काही खात्यांमधील संशयास्पद व्यवहारांचा अहवाल देण्यात अपयशी ठरल्याने आणि आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत योग्य ती काळजी न घेतल्याबद्दल सार्वजनिक क्षेत्रातील युनियन बँक ऑफ इंडियावर वित्तीय गुप्तचर यंत्रणेने ५४ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

आर्थिक गुन्ह्यांचा मुकाबला करण्यासाठी केंद्राकडून स्थापित वित्तीय गुप्तचर यंत्रणेने १



ऑक्टोबर रोजी 'पीएमएलए'च्या कलम १३ अंतर्गत युनियन बँकेला दंडाची नोटीस जारी केली होती. बँकेकडून तिला प्रतिसाद म्हणून दाखल लेखी आणि तोंडी उत्तर विचारात घेतल्यावर तिच्यावरील आरोपांची पुष्टी करत, ही दंडाची कारवाई केली गेली. बँकेच्या कारभाराचा व्यापक आढावा घेण्यात आला, ज्यात केवायसी आणि आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या अनुपालनाशी संबंधित अनेक उल्लंघने आणि अनियमितता उघडकीस आल्या. युनियन बँकेच्या मुंबईतील हिल रोड शाखेशी संलग्न हे प्रकरण आहे. येथील विशिष्ट चालू खात्यांच्या स्वतंत्र तपासणीत असे दिसून आले की, बँकेतर वित्तीय कंपनी (एनबीएफसी) आणि तिच्याशी संबंधित संस्थांची खाती मोठ्या प्रमाणात संशयास्पद निधी हस्तांतरणामध्ये गुंतलेली होती.

# पाकिस्तानच्या फिरकीपटूंची कमाल

## इंग्लंडच्या खेळाडूंनी साजिद खानसमोर टेकले गुडघे

**रावळपिंडीः** पाकिस्तान-इंग्लंड कसोटी मालिकेतील अंतिम सामन्याला आजपासून सुरुवात झाली. पाकिस्तानमधील रावळपिंडी क्रिकेट मैदानावर हा सामना खेळवण्यात येत आहे. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. साजिद खानने कमाल करून दाखवली आणि इंग्लंडचा निम्मा संघ माघारी पाठवला. त्याला नोमान अली व झहीद महमूदची साथ मिळाली व दोघांनी पाकिस्तानचा डाव २६७ धावांवर आटोपला. इंग्लंडकडून सलामीसाठी आलेल्या झॅक क्रॉली व बेन डकेटने सामन्याची सकारात्मक सुरुवात केली. १३ व्या षटकात नोमान अलीने झॅक क्रॉलीला माघारी पाठवले आणि इंग्लंडला ५६ धावांवर पहिला झटका मिळाला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या ऑली पॉप व जो रूटला साजिद खानने स्वस्तात बाद केले. सलामीवीर बेन डकेटचे अर्धशतक पूर्ण होताच नोमान अलीने त्याला ५२ धावांवर पायचीत केले. त्यानंतर साजिद खानने पुन्हा आपल्या फिरकीने हॅरी ब्रुक व बेन स्टोक्सला फसवले व त्यांना मागोमाग तंबुत परतावले. ९८ व ५ बाद अशी इंग्लंडची बिकट परिस्थिती झालेली, पण सातव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या जेमी स्मिथने इंग्लंडची खेळी सावरण्यास सुरुवात केली.



# सरफराज खानने चेंडूला हात न लावता घेतली विकेट

**पुणेः** तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना जिंकून न्यूझीलंडने मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. त्यामुळे दुसऱ्या कसोटी सामन्यात टिम इंडियासमोर कमबॅकचे आव्हान आहे. असे असताना नाणेफेकीचा कौल न्यूझीलंडच्या बाजूने लागला आणि प्रथम फलंदाजी स्वीकारली. न्यूझीलंडने डावाची

### टॉम लॅथमला १५ धावांवर असताना पाठवले तंबूत


सुरुवात सावधपणे केली. ३२ धावा असताना आर अश्विनने पहिली विकेट मिळवून दिली. टॉम लॅथमला १५ धावांवर असताना तंबूत पाठवले. त्यानंतर डेवॉन कॉनवे आणि विल यंग या जोडीने डाव पुढे नेण्यास सुरुवात केली. या दोघांमध्ये ४४ धावांची भागीदारी झाली होती. त्यामुळे टिम इंडियाचे टेन्शन वाढत होते. विकेटसाठी मेहनत घेऊनही हाती काही लागत नव्हते. दुसऱ्या विकेटसाठी सरफराज खानचे योगदान खूप महत्त्वाचे ठरले. त्याने चेंडूला हात न लावता टिम इंडियाला विकेट मिळवून दिली. न्यूझीलंडच्या डावातील २४ व्या षटकात हा प्रकार घडला.

# सीएची नोकरी सोडली; आईसोबत सुरू केला व्यवसाय

## वर्षाला कमावतोय ५० लाख रुपये

**पुणेः** गेल्या काही वर्षांत भारतात अनेक स्टार्टअप्स सुरू झाले आहेत आणि दरवर्षी लाखो कोटी रुपये कमावत आहेत. आज हे स्टार्टअप वार्षिक ५० लाख रुपयांपर्यंत कमाई करत आहे. Mighty Millets स्टार्टअप्स हा २०१८ मध्ये सुरू झाला. याची सुरुवात आई-मुलाच्या जोडीने केली होती. ही कंपनी ५० पेक्षा जास्त फूड प्रोडक्ट तयार करते. ही कंपनी सध्या भारतातील अनेक मोठ्या शहरांमध्ये न्यूट्रिशन बार, ग्रॅनोला, कुकीज, वर्मीसेली, नूडल्स, पास्ता, पॅनकेक मिक्स आणि चिप्स यांसारखी उत्पादने पुरवते.

सीए म्हणून काम करणारे साहिल जैन आणि त्यांची आई मीना यांनी २०१८ साली हे स्टार्टअप सुरू केला. साहिल जैन हा




कॉर्पोरेटमध्ये काम करायचा, पण त्याला स्वतःचे काहीतरी करायचे होते. हळूहळू, साहिल जैन याने मायटी मिलेट्स एक फायदेशीर व्यवसाय उभारला. पुणे, बेंगळुरू, दिल्ली आणि मुंबई येथे ताज ग्रुप आणि जेडब्ल्यू मॅरियट सारख्या ५० हून अधिक हॉटेल्ससह ग्राहक तयार केले.

# दिवसभराच्या चढ-उतारानंतर सेन्सेक्स-निफ्टी फ्लॅट बंद

## बँकिंग आणि ऑटो शेअर्समध्ये वाढ

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबईः** शेअर बाजारासाठी गुरुवार (२४ ऑक्टोबर) हा चढ-उताराचा दिवस होता. आज सेन्सेक्स-निफ्टी घसरणीसह बंद झाले. एचयूएलच्या खराब निकालांमुळे आज संपूर्ण एफएमसीजी क्षेत्र दबावाखाली राहिले आणि यामुळे बाजार वाढू शकला नाही. बँक निफ्टी सुमारे ३०० अंकांच्या



वाढीसह ५१,५०० च्या वर बंद झाला. सेन्सेक्स १६ अंकांनी घसरला आणि ८०,०६५ वर बंद झाला. निफ्टी ३६ अंकांनी घसरून २४,३९९ वर बंद झाला.

बँक निफ्टी २९२ अंकांनी वाढून ५१,५३१ वर बंद झाला. वित्तीय, बँकिंग आणि हेल्थकेअर स्टॉक्स वगळता बहुतांश क्षेत्रीय निर्देशांक लाल रंगात बंद झाले.

# सुनील गावसकर यांनी केली रोहितच्या कर्णधारपदावर टीका

## म्हणाले, निगेटीव्ह कॅप्टन...

**पुणेः** भारत-न्यूझीलंड यांच्यातल्या दुसऱ्या कसोटीत नाणेफेकीचा कौल बाजूने लागल्यामुळे न्यूझीलंडने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि अपेक्षेप्रमाणे जलदगती गोलंदाजांना सुरुवातीला काही मदत



मिळाली नाही. त्यामुळेच कर्णधार रोहित शर्माने ८व्या षटकात आर अश्विनला गोलंदाजीला आणले आणि त्याने विकेट मिळवून दिली. डेव्हॉन कॉनवे व विल यंग यांनी भारतीय फिरकीपटूंना हैराण केले आणि त्यावरून महान फलंदाज सुनील गावसकर कर्णधार रोहितवर संतापलेले दिसले.

# आजच्या दिवशी विराटने सर्वात जलद 10 हजार धावा केल्या पूर्ण



## सचिनचा महाविक्रम मोडला

**विशाखापट्टणम :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहली याने त्याच्या ध्रुव कारकिर्दीत २९६ सामन्यांच्या २८३ डावात १३,९०६ धावा केल्या आहेत. विराट सध्याच्या काळातील सर्वश्रेष्ठ खेळाडू आहे. विराटने ७ वर्षांपूर्वी, आजच्या दिवशी म्हणजेच २४ ऑक्टोबर २०१८ रोजी सर्वात जलद १० हजार धावा करण्याचा पराक्रम केला होता. त्याने या महाविक्रमात सचिन तेंडुलकरला मागे टाकले होते.

विराटने २४ ऑक्टोबर २०१८ रोजी वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यात एकदिवशीय क्रिकेटमध्ये १० हजार धावा पूर्ण केल्या. विराट कोहलीने १० हजार वनडे धावा पूर्ण करण्यासाठी एकूण २०५ डाव खेळले. त्याचवेळी ही कामगिरी करण्यासाठी सचिनला २५९ वेळा फलंदाजीला यावे लागले. या विक्रमात तिसऱ्या क्रमांकावर माजी कर्णधार सौरव गांगुली आहे. रिकी पॉंटिंगने २६६ आणि जॅक कॅलिसने २७२ सामन्यात ही कामगिरी केली होती. दरम्यान, विराटने ज्या सामन्यात १० हजार धावांचा टप्पा गाठला होता, तो खूपच रोमहर्षक होता. विशाखापट्टणम येथे झालेला हा सामना टाय झाला होता.

# कोट्यवधींच्या जप्त रकमेचे गौडबंगाल आहे तरी काय?

राज्यात विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी राजकीय पक्षांकडून सुरू आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने, उमेदवारांवर आणि राजकीय पक्षांवर आयोगाकडून बंधने आली आहेत. त्यामुळे पूर्वीच्या काळी निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या उमेदवारांचे पोस्टर वॉर किंवा जी फलकबाजी व्हायची ती आयोगाच्या निर्बंधामुळे. रस्त्यावर निवडणूक सुरू आहे की नाही हे वातावरण तयार झाले नसले तरी या कालावधीत कोट्यवधी रुपयांच्या रकमा पोलिसांना सापडत असल्याने निवडणुका आणि पैसा यांचा कसा संबंध आहे, याकडे मतदारांचे लक्ष जात आहे. त्याचे कारण आदर्श आचारसंहिता असल्याने मतदारांना पैशांच्या आमिषाने आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करू नये, यासाठी तपास यंत्रणांची करडी नजर असली तरी, निवडणूक काळात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीचा नेमका अर्थ काय काढायचा याचे कोडे खरे तर निवडणूक आयोगाने सोडवायला हवे, अशी सामान्य मतदारांची अपेक्षा असू शकते.

तसेच, पोलीस कारवाईत जप्त केलेल्या रकमेची किंवा मालमत्तेचे पुढे काय होते याबाबत सर्वसामान्य नागरिकांना उत्सुकता कायम राहिलेली आहे. त्यात पुण्यातील खेड-शिवापूर टोलनाक्यावर पुणे पोलिसांकडून पाच कोटी रुपयांची रक्कम जप्त केली होती. एका पांढऱ्या रंगाची इनोव्हा कारची तपासणी करताना, त्यामध्ये ५०० रुपयांच्या बंडलमध्ये पाच कोटी रुपये सापडले, असे पोलिसांकडून सांगण्यात आले असले तरी, त्या गाडीत १५ कोटी रुपये होते, असा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. आयकर विभागाकडे पुढील चौकशीसाठी ही रक्कम देण्यात आली असली तरी, ती गाडी नेमकी कोणाची होती, कोणत्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा या रकमेशी संबंध होता, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. त्यामुळे अशा प्रकरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना कुतूहल निर्माण झालेले आहे. दुसरे एक मोठे प्रकरण म्हणजे, पुणे शहरात नाकाबंदी दरम्यान शुक्रवारी संशयित वाहनाची झडती घेताना, १३८ कोटी रुपयांचे सोने पोलिसांना सापडले. हे सोने नेमके कुठून आले? कुठे नेले जात होते? त्याचा मालक कोण? याचा आता पोलिसांकडून शोध सुरू करण्याअगोदर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये बातम्या झळकल्या. त्यामुळे हे सोने कोणाच्या मालकीचे याची चर्चा झाली. पोलिसांनी नंतर याचा खुलासा केला असला तरी पूर्ण खात्री होईपर्यंत माध्यमांपर्यंत चुकीच्या बातम्या येऊ नये याची खबरदारी निवडणूक आयोगाने घ्यायला हवी. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी राज्यातील सर्वच प्रमुख शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी केली आहे, त्यात हे सोन्याचे घबाड सापडल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहे. विधानसभा निवडणुकीतील गैरप्रकार टाळण्यासाठी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार खबरदारी घेण्यात येते. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात येत आहे. राज्यात अनेक ठिकाणी पोलिसांकडून कोट्यवधी रुपये जप्त करण्यात आले आहेत. त्या तपासणीत आता सोन्याची भर पडली आहे. कोणतीही निवडणूक आली की खर्च आलाच. जिंकण्यासाठी 'होऊ दे खर्च', अशी उमेदवारांची भूमिका असते. त्यामुळेच निवडणूक आयोगाकडून उमेदवारांना खर्चाच्या मर्यादा घातल्या आहेत. तसा तपशील प्रतिदिन द्यावा लागतो. यावेळी विधानसभेसाठी खर्चाच्या मर्यादेत निवडणूक आयोगाने वाढ केली आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारांना ४० लाखांपर्यंत खर्च करता येणार आहे. यापूर्वी २८ लाख एवढा खर्च मर्यादा होती. यात निवडणूक आयोगाने १२ लाखांची वाढ केली आहे. मात्र, नाकाबंदीत ५ ते १० कोटींची रक्कम सापडत असेल, तर निवडणूक काळात किती पैशांचा पाऊस पडत असेल याचा विचार करता येईल. तसेच, निवडणुकीत गैरप्रकार टाळण्यासाठी आयोगाने धडक नियोजनाचा भाग म्हणून उमेदवारांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवले आहे. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यातील सीमेवर तपासणी पथक तयार केली आहेत. त्याचवेळी आंतरराज्य सीमेवर पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. दुसऱ्या राज्यातून अवैध वाहतुकीवर निर्बंध आणले आहे. तसेच सीमा नाक्यावर सीसीटीव्हीही बसवण्यात आले आहेत.

या कडक कारवाईची परिणती म्हणून रविवारी विदर्भात आणखी एक मोठी कारवाई झाली. मध्य प्रदेश महाराष्ट्राच्या सीमेवर सुमारे चार कोटी रुपयांचे सोने जप्त करण्यात आले. लोकसभा निवडणूक (२०२४) काळात होणाऱ्या पैशांच्या गैरवापरावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यावर अंकुश ठेवण्यासाठी, आयकर विभागाच्या, पुणे शाखेने २४ x ७ कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला होता. हा नियंत्रण कक्ष दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस (२४ x ७) कार्यरत होता. या कक्षात नागरिकांना त्यांच्या तक्रारी नोंदवता याव्यात यासाठी किंवा पैशांच्या गैरवापराची माहिती देता यावी यासाठी पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या जिल्ह्यांसाठी टोल फ्री क्रमांक, व्हॉट्सअॅप क्रमांक देण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीच्या काळातही नाकाबंदीत पैसे जप्त करण्यात आल्याच्या बातम्या आल्या होत्या; परंतु त्यात किती तथ्य आहे. पुढे संबंधित कारवाईबाबत काय झाले याची माहिती मिळत नसल्याने, हा फक्त कारवाईचा फार्स आहे का, अशी शंका निर्माण होण्यास वाव आहे. पोलिसांनी जप्तीच्या केलेल्या कारवाईचा फटका एकाही लोकसभा उमेदवाराला बसल्याचे ऐकीवात नाही. त्यामुळे महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षांचा प्रचार सभांचा धडाका सुरू आहे. त्याचवेळी निवडणूक आयोग सक्रिय झाला आहे, या पाच कोटींची रक्कम आणि सोने जप्त कारवाईवरून दिसून येत असले तरी, या कारवाईचे पुढे नेमके काय होते, हे पाहणे पुढील काळात महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# जादा मुले होऊ देण्यामागील अजब तर्कट!

## दृष्टिक्षेप

**कैलास ठोळे**

भारतात लोकसंख्यावाढ ही एक समस्या आहे. चीनपेक्षा भारताची लोकसंख्या जास्त झाली आहे. जगातील अनेक देशांमध्ये लोकसंख्या स्थिर होत आहे. भारतात त्यासाठी अजून किमान ४५ वर्षे लागतील. अशी स्थिती असताना कथित संतांबरोबरच राजकीय नेतेही सामान्यांनी जादा मुले जन्माला घालावीत अशी भाषा सुरू केली आहे. यामागील हेतू धार्मिक नसून उत्तर भारतातील लोकसंख्यावाढीमुळे त्यांचा त्रागा होत आहे.

'त्यां'ना जादा मुले होतात, त्यामुळे आपला धर्म संकटात आहे, आता महिलांनी किमान पाच मुले जन्माला घातली पाहिजेत, असे अजब सल्ले कथित संत देत होते. त्यांची विधाने अज्ञानातून येत असतात. जादा अपत्ये आणि निरक्षरता यांचा जवळून संबंध असतो. जनगणना आणि वेगवेगळ्या सर्वेक्षण अहवालातूनही हिंदूंचा जन्मदर जसा कमी झाला, तसाच तो मुस्लिमांचाही झाला. पूर्वी मुस्लीम महिलांचा जनन दर फार जास्त होता. त्या प्रमाणात हिंदूंनी कुटुंब नियोजनावर भर दिला. मागील काही सर्वेक्षणानंतर हिंदूंचा जननदर अतिशय कमी झाला असल्याचे चित्र समोर आले आहे. मुस्लिमांचा जननदर जास्त असला तरी पूर्वीच्या तुलनेत तो फार कमी झाला आहे, याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. जादा अपत्ये जन्माला घालण्याचा सल्ला देणारे या अपत्यांचा पालनपोषणाचा खर्च कुणी करायचा, हे सांगत नाहीत. त्याचबरोबर मुले जन्माला घालणे हाताचा मळ नव्हे. महिलांच्या आरोग्याशी तो खेळ असतो. शिवाय कुणी किती मुले जन्माला घालायची, हा त्या त्या कुटुंबाचा अधिकार असतो. इतरांनी त्यात नाक खुपसण्याचे कारण नाही. एकीकडे साक्षरता वाढली, तंत्रज्ञान आले आणि दुसरीकडे त्याचा दुरुपयोग सुरू झाला. गर्भात कळ्या खुडण्याचे कत्तलखाने सुरू झाले. मुलींच्या जन्माचे प्रमाण घटल्याने सामाजिक प्रश्न निर्माण झाले. भारतात लोकसंख्यावाढ ही अजूनही एक समस्याच आहे. चीनपेक्षा भारताची लोकसंख्या जास्त झाली आहे. लोकसंख्या स्थिर होत असते. जगातील अनेक देशात ही वेळ आली आहे. भारतात त्यासाठी अजून किमान ४५ वर्षे लागतील, अशी स्थिती असताना आता कथित संतांबरोबर वेगवेगळ्या पक्षांचे राजकीय नेतेही जादा मुले जन्माला घालण्याची भाषा करायला लागले आहेत. त्यांचा हेतू धार्मिक नसून उत्तर भारतातील लोकसंख्यावाढीमुळे त्यांचा त्रागा होत आहे.

साक्षरता वाढवणाऱ्या, लोकसंख्यावाढीला आळा घालणाऱ्या राज्यांना आता इतर राज्यांच्या तुलनेमध्ये कमी निधी मिळतो. नियोजनाचे हेच फलित का, असा प्रश्न आता या राज्यांना पडायला लागला आहे. नियोजन न करणाऱ्या, लोकसंख्या बेसुमार वाढवणाऱ्या, कौटुंबिक, आर्थिक स्तर उंचावला नसलेल्यांना जादा निधी मिळत असल्याने तसेच त्यांचे मतदारसंघ वाढत असताना नियोजनपूर्वक लोकसंख्यावाढ रोखणाऱ्यांच्या राज्यांचा निधी इतरांकडे जात असल्याने त्राग्यातून दोन राज्यांच्या प्रमुख नेत्यांनी अलीकडेच ही भाषा वापरली. साक्षरता आणि कुटुंबाचा आर्थिक दर्जा यांचाही अन्योन्य संबंध असतो. उत्तर भारतात साक्षरतेचे प्रमाण दक्षिणेच्या तुलनेने कमी असल्यामुळे लोकसंख्यावाढ जास्त असे समीकरण आहे. या समीकरणाला छेद देण्याऐवजी सरकारही त्यांचेच लाड करत असल्याने दोन परस्परविरोधी विचारांच्या मुख्यमंत्र्यांच्या विधानात सारखेपणा आला, यामागचा कार्यकारणभाव लक्षात घ्यायला हवा. दक्षिण भारतातील दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावर चर्चा करण्याचे कारण म्हणजे दोन्ही मुख्यमंत्र्यांनी अधिक मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशमधील लोकांना किमान दोन किंवा त्याहून अधिक मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी तर प्रत्येक कुटुंबामध्ये १६ मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला.



भारतातील दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावर चर्चा करण्याचे कारण म्हणजे दोन्ही मुख्यमंत्र्यांनी अधिक मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशमधील लोकांना किमान दोन किंवा त्याहून अधिक मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी तर प्रत्येक कुटुंबामध्ये १६ मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला. हे सल्ले समोर आल्यापासून सर्वसामान्यांच्या मनात तसेच 'सोशल मीडिया'वर प्रश्न उपस्थित होत आहेत की राजकारणाचा पुरेसा अनुभव असलेल्या या दोन नेत्यांनी अधिक मुले जन्माला घालण्याचा आग्रह का धरला? तेही भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना आणि आपण लोकसंख्या नियंत्रणावर काम केले पाहिजे, असे म्हटले जात असताना असा आग्रह धरला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र सरकार 'हम दो हमारे दो'चा आग्रह धरत आहे. याच दरम्यान दक्षिण भारतातील दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याने लोकांना नक्कीच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

हे सल्ले समोर आल्यापासून सर्वसामान्यांच्या मनात तसेच 'सोशल मीडिया'वर प्रश्न उपस्थित होत आहेत की राजकारणाचा पुरेसा अनुभव असलेल्या या दोन नेत्यांनी अधिक मुले जन्माला घालण्याचा आग्रह का धरला? तेही भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना आणि आपण लोकसंख्या नियंत्रणावर काम केले पाहिजे, असे म्हटले जात असताना असा आग्रह धरला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र सरकार 'हम दो हमारे दो'चा आग्रह धरत आहे. याच दरम्यान दक्षिण भारतातील दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याने लोकांना नक्कीच आश्चर्याचा धक्का बसला आहे. दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची विधाने समजून घेण्यासाठी देशातल्या प्रजनन दरासह इतर अनेक महत्त्वाच्या बाबी समजून घ्याव्या लागतील. भारतातील प्रजनन दर सातत्याने घसरत आहे आणि त्यामुळे देशातील वृद्ध लोकसंख्या वाढत आहे. २०५० पर्यंत पाचपैकी एक व्यक्ती ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची असेल आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये तिचा प्रभाव जास्त असेल, असा अंदाज आहे. यामुळे नायडू आणि स्टॅलिन यांना चिंता आहे. 'युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड' आणि 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस'(आयआयपीएस) यांनी तयार केलेल्या 'इंडिया एजिंग रिपोर्ट'नुसार, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणामधील वृद्ध लोकसंख्या बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड, राजस्थान आणि मध्य प्रदेशपेक्षा जास्त आहे.

या अहवालानुसार, केरळच्या लोकसंख्येतील वृद्ध लोकांचा वाटा २०२१ मध्ये १६.५ टक्क्यांवरून २०३६ मध्ये २२.८ टक्क्यांपर्यंत वाढेल; म्हणजेच तो सहा टक्क्यांपेक्षा थोडा जास्त असेल. त्याचप्रमाणे, तामिळनाडूमध्ये १३.७ टक्क्यांवरून २०.८ टक्के, आंध्रमध्ये १२.३ टक्क्यांवरून १९ टक्के, कर्नाटकमध्ये वृद्ध लोकसंख्या ११.५ टक्क्यांवरून १७.२ टक्क्यांपर्यंत तर तेलंगणामध्ये ११ टक्क्यांवरून १७.१ टक्क्यांपर्यंत वाढेल. उत्तर भारतात वृद्ध लोकसंख्येच्या वाढीचा वेग दक्षिण भारताच्या तुलनेत खूपच कमी आहे. बिहारमधील वृद्ध लोकसंख्या ७.७ टक्क्यांवरून ११ टक्के (३.३ टक्क्यांची वाढ) होईल. उत्तर प्रदेशमध्ये जवळपास अशीच वाढ होईल आणि येथील वृद्ध लोकसंख्या ८.१ टक्क्यांवरून ११.९ टक्के होईल. झारखंडमध्ये हे प्रमाण ८.४ टक्क्यांवरून १२.२ टक्के, राजस्थानमध्ये ८.५ टक्क्यांवरून १२.८ टक्के, तर मध्य प्रदेशमध्ये ८.५ टक्क्यांवरून १२.८ टक्क्यांपर्यंत वाढेल. १५ वर्षांच्या कालावधीत दक्षिण भारतात वृद्धांची संख्या सहा ते सात टक्क्यांनी तर उत्तर भारतात तीन ते चार टक्क्यांनी वाढेल. 'इंडिया एजिंग रिपोर्ट'नुसार दर शंभर मुलांमध्ये (१५ वर्षांपेक्षा कमी) वृद्धांची संख्या (६० वर्षांपेक्षा जास्त) मध्य आणि ईशान्य भारताच्या तुलनेत दक्षिण आणि पश्चिम भागात जास्त असेल. दक्षिणेकडील राज्यांमध्ये २०३६ पर्यंत शंभर मुलांमागे ६१.७ वृद्ध असतील, तर जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, हरियाणा, दिल्ली, राजस्थानमध्ये ही संख्या शंभर मुलांमागे ३८.९ वृद्ध असेल. उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमध्ये हा आकडा शंभर मुलांमागे २७.८ वृद्ध असा असेल.

प्रजनन दर आंध्र प्रदेशमध्ये १.५, कर्नाटकमध्ये १.६, तर केरळ, तामिळनाडू, तेलंगणामध्ये १.५ आहे. भारताचा प्रजनन दर २ आहे. दक्षिण भारतातील राज्ये श्रीमंत होण्याआधीच म्हातारी होत आहेत. लोकसंख्येचा प्रश्न भारतातील लोकसभेच्या जागांच्या सीमांकनाशीही जोडलेला आहे. २०२६ मध्ये देशभरात लोकसभेच्या जागांचे परिसीमन होणार आहे. दक्षिण भारतातील राज्यांना भीती आहे की सीमांकनामध्ये उत्तर भारतातील लोकसभेच्या जागांची संख्या वाढू शकते, तर दक्षिणेतील राज्यांचा वाटा कमी होऊ शकतो. जन्मदर असाच राहिल्यास आंध्र प्रदेशमध्ये लोकसभेच्या जागा २५ वरून २०, कर्नाटकमध्ये २८ वरून २६, केरळमध्ये २० वरून १४, तामिळनाडूमध्ये ३९ वरून ३० आणि तेलंगणमध्ये ३० वर येऊ शकतात. उत्तर भारतात लोकसंख्या जास्त असल्याने येथील लोकसभेच्या जागा वाढतील आणि दक्षिणेपेक्षा त्यांचा आवाज संसदेत अधिक बळकट होईल. सीमांकनामुळे दक्षिणेकडील राज्यांच्या २४ जागा कमी होतील. २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत उत्तरेकडील राज्यांना ३२ जागा जादा मिळतील. 'थिंक टँक कार्नेगी एंडॉवमेंट फॉर इंटरनॅशनल पीस'ने प्रकाशित केलेल्या 'इंडियाज लूमिंग क्रायसिस ऑफ रिप्रेझेंटेशन' या शीर्षकाखालील अभ्यासात म्हटले आहे की, या प्रक्रियेत तामिळनाडू आणि केरळला १६ जागा गमवाव्या लागतील. स्टॅलिन यांनी लोकसंख्याशास्त्रीय बदलाचा मुद्दा सीमांकन प्रक्रियेशी जोडला. सीमांकन प्रक्रियेमुळे संसदेतील दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होईल, ही भीती त्यांनी व्यक्त केली. स्टॅलिन आणि चंद्राबाबू नायडू व्यक्त करत असलेलीच भीती जयराम रमेश यांनीही व्यक्त केली आहे.

# परतीच्या पावसामुळे शेतकरी संकटात

पावसाळा ऋतू जरी संपला तरी अधून मधून पावसाचे आगमन होत आहे. त्यामुळे शेतकरी राजाने खूप मेहनतीने लावलेल्या कोकण विभागातील भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसे इतर विभागामध्ये नुकसान झाल्याचे दिसते. आधीच पाऊस उशिराने सुरू झाला, त्यात अनेक शेतकऱ्यांना दुबारा पेरणी करावी लागली होती. त्यानंतर शेतकऱ्यांनी खूप कष्टाने मेहनत घेऊन शेती केली. मात्र आता तयार झालेले भातपीक कापणीच्या वेळी तर परतीच्या पावसामुळे मातीमोल झाले आहे. त्यामुळे शेतकरी राजाच्या हातातोंडाशी आलेला घास जाणार म्हणून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. तेव्हा त्यांना शासकीय आर्थिक मदतीची खरी गरज आहे.

आपल्या राज्यात मोठ्या कष्टाने शेतकरी राजाने मेहनत घेऊन शेती केली होती. त्यासाठी बी-बियाणे, खते विकत घेऊन व अंगमेहनतीने शेतकऱ्यांनी शेतीची लागवड केली. त्यात पीक सुद्धा बऱ्यापैकी आले. मात्र ऐन कापणीच्या वेळी परतीच्या पावसाने रात्री व संध्याकाळच्या वेळी विजांच्या कडकडाटांत जोरदार हजेरी लावल्याने पिकलेले भात जमिनीवर पडले. त्यामुळे काही ठिकाणी वाफ्यात पाण्यावर भातपीक तरंगताना दिसत असून काही ठिकाणी भाताला कोंब आलेले दिसत आहेत. त्यामुळे दिवाळी आधीच शेतकऱ्यांचे दिवाळे वाजले असे म्हणता येईल. तेव्हा अजूनही पावसाचा जोर कमी झालेला नाही. याचा परिणाम शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यासाठी शेतकरी राजाला नैसर्गिक संकटातून वाचविण्यासाठी शासनाने आधार द्यायला हवा. ज्या शेतकऱ्याचे अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झाले असेल त्यांचे शासकीय स्तरावर तातडीने पंचनामे करून त्यांना तत्काळ नुकसानभरपाई देण्यात आली पाहिजे.

सध्या राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी चालू असताना शेतकरी राजा मात्र संकटात असताना दिसत आहे. त्यामुळे त्यांना आता आधार देणे ही शासनाची जबाबदारी आहे. शेतीच्या लागवडीच्या वेळी बांधावर जाणारे नेते मंडळी आता शेतकऱ्यांच्या संकटाच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. कारण शेतकरी हाच हक्काचा मतदार असतो. त्यांनी ठरविले की अमुक व्यक्तीला मतदान करायचे, नंतर कोणीही आले तरी आपला शब्द बदलत नाहीत. हे निवडणूक रिंगणात असणाऱ्या नेत्यांना चांगले माहीत आहे. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांच्या संकटात खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. इतकेच नव्हे तर तातडीने शासकीय मदत सुद्धा मिळवून दिली पाहिजे. यातच त्यांचा खरा विजय आहे. तेव्हा निवडणुकीच्या रिंगणात असणाऱ्या नेत्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता आधार देणे हे त्यांचे पहिले कर्तव्य आहे. कारण आपला देश हा शेतीप्रधान देश आहे. शेतकरी खूश तर आपण खूश हे तत्त्व त्यांना माहीत आहे.



आता परतीच्या पावसाचा विचार करता, शेतकरी दादाच्या मागील चार महिन्यांच्या कष्टावर पाणी फेरले गेले आहे असे म्हणावे लागेल. तेव्हा भात पिकाचा हातातोंडाशी आलेला घास मातीमोल झाल्याने शेतकरी राजासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी शासन पातळीवर निवडणुकीचे कारण पुढे न करता शेतकरी राजाला तातडीने आर्थिक मदत करणे हे महाराष्ट्र शासनाचे आद्य कर्तव्य आहे.

पावसामुळे नुकसान तर दरवर्षी होत असले तरी वरकसल न केल्यामुळे जंगली प्राण्यांचा अधिक वावर पाहायला मिळतो. सध्या तर माकडांनी हैदोस घातलेला दिसत आहे. बरीच घरे बंद असल्याने त्यांचे मुक्काम त्या बंद घरात असते. सकाळ झाली की पोटापाण्यासाठी आसपास फिरून संध्याकाळी पुन्हा त्या घरात यायचे म्हणजे शेतीचेच नव्हे तर बंद घरांचे सुद्धा नुकसान होत आहे. तसेच शेतकऱ्यांना घर बंद करून कुठे जायला नको लागलीच त्यांच्या घराच्या आसपास शेती केली असेल किंवा बाग केली असेल तर त्याचे नुकसान करतात. तसेच काही शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून विविध प्रकारच्या भाज्यांची लागवड करतात मात्र शेतकऱ्यांचा डोळा चुकवून भाज्यांचे सुद्धा नुकसान करतात. त्यामुळे आपण जीवन कसे जगावे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण होत आहे. आपण मेहनत घेऊन सुद्धा काहीच फायदा नाही असे शेतकऱ्यांना वाटू लागले आहे. त्यामुळे शेतकरी राजा आपल्या मुलांना शहराकडे पाठवीत आहेत. याचा परिणाम खेड्यातील कित्येक घरे बंद असताना दिसतात. मी, जेव्हा माझ्या आयनल गावी शेती करायचो तेव्हा सुद्धा हाच प्रकार असायचा मात्र जंगली प्राण्यांचा घरा शेजारी वावर नसायचा. तेव्हा जेवढे भात कापत असू तेवढे घराच्या पडवीत आणून ठेवायचो. तिथेच भात झोडत असू नंतर गवताच्या पेंढ्या बांधून पडवीच्या एका बाजूला ठेवायचो. जेव्हा उन्ह पडत असे त्यावेळी गवत सुखत घातले जायचे तर भात खळ्यावर सुखत घालायचो. ही कामे बहीण लता करायची. आता तर पावसामुळे गवत कुजत असल्याने गुरांना लागणारे गवत कमी पडणार. महत्त्वाची बाब म्हणजे कुजलेल्या गवताला वास येत असल्याने गुरे गवत खात नाहीत. याचा मोठा फटका शेतकरी दादांना होणार आहे. निवडणुका येतील आणि जातील मात्र अशा संकटामध्ये शेतकरी दादांच्या मागे कृषी विभागाने खंबीरपणे पाठीशी उभे राहिले पाहिजे. यातच आपल्या देशाचे खरे भवितव्य आहे. कारण आपल्या देशातील उदरनिर्वाह करणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता आजही दोन-तृतीयांश लोक शेतीक्षेत्रावर अवलंबून आहेत.



**रवींद्र तांबे**

## राशिभविष्य

शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४

### ॥ पंचांग ॥

आज मिती अश्विन कृष्ण दशमी शके १९४६. चंद्र नक्षत्र आश्लेषा ०९.४६ पर्यंत नंतर मघा. योग शुक्ल, चंद्र राशी सिंह, भारतीय सौर ४ कार्तिक शके १९४६, शनिवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२४. मुंबईचा सूर्योदय ०६.३६, मुंबईचा सूर्यास्त ०६.०८, मुंबईचा चंद्रोदय ०२.१९ उद्याची, मुंबईचा चंद्रास्त ०२.३९, राहू काळ ०९.२९ ते १०.५५.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : पुढील कामाचे नियोजन कराल.

**वृषभ** : प्रगतीच्या दृष्टीने मनासारखी कामे होतील.

**मिथुन** : आर्थिक आवक चांगली राहील.

**कर्क** : खर्चाचे प्रमाण वाढू शकते.

**सिंह** : अनेक महत्त्वाचे प्रश्न सुटतील.

**कन्या** : मालमत्तेचे प्रश्न सुटतील.

**तूळ** : महत्त्वाच्या कामांसाठी वेळ द्याल.

**वृश्चिक** : आर्थिक प्राप्ती चांगली राहील.

**धनू** : आरोग्यावर लक्ष असू द्या. रागावर नियंत्रण आवश्यक.

**मकर** : वस्तुस्थितीचा विचार करूनच निर्णय घ्या.

**कुंभ** : नोकरीत वादापासून दूर राहा.

**मीन** : भावंडांच्या गाठीभेटी होतील.

## जनसंवाद

### राज्याच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करावे

भारत देश हा लोकसंख्येच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे. लोकसंख्येवर नियंत्रणासाठी जनसंख्या नियंत्रण धोरणाचा अवलंब केला जात होता. मात्र, सध्या देशात वाढत जाणाऱ्या वृद्धांची संख्या आणि कमी होत चाललेल्या युवकांच्या संख्येमुळे चिंता व्यक्त केली जात आहे. अशा वेळी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री यांनी राज्यात किमान दोन किंवा अधिक मुलांना जन्माला घालून जन्मदर वाढविण्याचा सल्ला दिला. नायडू यांनी नवीन लोकसंख्या धोरण आणण्याचा निर्णय घेतला आहे. नायडू यांच्या या विधानावरून वाद निर्माण झाला असतानाच तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनीही त्यांचीच री ओढली. खरेतर कुटुंब नियोजन मोहीम आणि लोकसंख्या नियंत्रणात दक्षिणेकडील राज्ये आघाडीवर आहेत. दक्षिणेकडील राज्यांचे महत्त्व वाढवायचे असेल तर लोकसंख्या वाढली पाहिजे; परंतु दक्षिणेकडील राज्ये अशा प्रकारे एकात एक सूर मिसळत असतील, तर देशात अंतर्गत सुरक्षेचा धोका निर्माण होऊ शकतो. लोकसंख्या वाढ ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. तेव्हा लोकसंख्या वाढीपेक्षा आपल्या राज्यातील विकास, आरोग्य, महिला सक्षमीकरण याकडे लक्ष केंद्रित करावे.

– **सुनील कुवरे,** शिवडी

### रांगोळी सम्राट कालवश!

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी ज्यांचे रांगोळी सम्राट म्हणून यथायोग्य वर्णन केले ते जगविख्यात रांगोळीकार गुणवंत मांजरेकर यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील कला क्षेत्रातील एका महान पर्वाचा अंत झाला. खरे तर रांगोळी म्हणजे भारतीय संस्कृतीतील मांगल्याचे आणि सौंदर्याचे प्रतीक! मूळ ६४ कलाप्रकारांमध्ये रांगोळीची गणना होते. त्या रांगोळीला पोर्ट्रेट स्वरूपात सादर करून जगापुढे आणण्याचे काम मांजरेकर यांनी केले. सुप्रसिद्ध राजकीय व्यक्ती, क्रिकेटपटू, छत्रपती शिवाजी महाराज इत्यादी विविध विषयांवर त्यांनी काढलेल्या रांगोळ्या आजही मोहवून टाकतात. त्यांनी संपूर्ण भारतात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत शेकडो रांगोळी प्रदर्शने भरविली. ८०च्या दशकात नवोदितांना रांगोळीमधून पोर्ट्रेट कसे साकारायचे याचे धडे देत रंगावली प्रदर्शन, त्यातील अर्थकारण, रांगोळीतील चित्रे दहा दिवस कशी टिकवून ठेवायची याचेही मार्गदर्शन केले, त्यांना भावपूर्ण आदरांजली!

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### मिरवणुका, शक्तिप्रदर्शन कशाला?

राज्यातील विधानसभा निवडणुकीतील सर्व पक्षांच्या उमेदवारांनी आपला अर्ज दाखल करण्यासाठी शक्तिप्रदर्शन केले. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याने अनेक मार्गांवर कोंडी झाली होती. लोकांना वेठीस का धरले जाते? उमेदवार, मी कोणत्या पक्षातर्फे निवडणुकीत उभा आहे हे मतदारांना सांगण्यासाठी ह्या मिरवणुका काढत आहेत का? निवडणूक आयोगाने अर्ज भरण्यासाठी काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांवर बंदी आणावी. उमेदवार मिरवणुका काढून अर्ज दाखल करण्यास आल्यास त्या उमेदवाराचा अर्ज स्वीकारू नये. उमेदवारांना आपले अर्ज कार्यालयात न येता ऑनलाईन भरावयास सांगणे. सर्व राजकीय पक्षांनी पुढाकार घेऊन मिरवणुका काढून अर्ज दाखल करण्याची प्रथा बंद का करीत नाहीत?

– **विवेक तवटे,** कळवा

### नवीन वाटा शोधणे सोपे नसते...

नवीन वाटा शोधणे सोपे नसते, त्यातही धोका पत्करून काही करणे सध्याच्या बेरोजगारीच्या काळात शक्य असेल का? नवीन प्रयोग किंवा नवीन वाटा चांगली आर्थिक परिस्थिती असलेल्यांना शक्य होतील. बाकीच्यांचे काय? आधुनिक काळात बदलत्या तंत्रज्ञानात उपयोगी शिक्षण घेतले तरच चांगले बदल दिसतील असे वाटते. यातून चांगली नोकरी किंवा व्यवसाय करता येईल असे वाटते.

– **प्र. मु. काळे,** सातपूर-नाशिक

### फटाके भारतीय संस्कृतीचा भाग नाहीत!

वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने गेल्या वर्षी दिवाळीत फटाके फोडण्यासाठी केवळ दोन तासांचा अवधी दिला होता. यंदाही नायालय फटाके फोडण्यासाठी वेळा ठरवून देईल. गतवर्षीच्या तुलनेत यंदाची परिस्थिती तेव्हढीशी गंभीर नसली तरी दिवाळीत प्रचंड प्रमाणात फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे तशी परिस्थिती उद्भवू शकते हे सुद्धा खरे आहे. न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेच्या व्यतिरिक्त अन्य वेळेत फटाके फोडले जात असतील, तर त्यावर कारवाई करण्याबाबत प्रशासन यंदा काय सिद्धता करणार आहे हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. फटाके फोडण्याची प्रथा ही मुळात भारतीय संस्कृतीचाच भाग नाही. दिवाळी आणि फटाके फोडणे यांचा तर तिळमात्र संबंध नाही. मग या विषवल्लीच्या छोट्या छोट्या फांद्या छाटण्यात वेळ घालवण्यापेक्षा प्रदूषणकारी फटाक्यांवर बंदी आणून मुळावरच का घाव घातला जात नाही?

– **मोक्षदा घाणेकर,** काळाचौकी

### ई- रिक्षा उद्योगासाठी मोठी संधी

निसर्गात जी खनिजे मुबलक आहेत व स्वस्तही आहेत अशा खनिजांवर बॅटरी बनविण्यासाठी अमेरिका आणि चीन या दोन देशांमध्ये गेल्या दहा वर्षांपासून संशोधन केले जात आहे. चीनमध्ये आजच्या घडीला ५० टक्के पदवीधर अभ्यासक्रम बॅटरी रसायनशास्त्रावर आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की, मोटारींच्या बॅटऱ्यांचे उत्पादन करणारे सर्वाधिक कारखाने आज चीनमध्ये आहेत. चीनच्या अर्थव्यवस्थेत बॅटरी निर्मितीचा हातभार २८ टक्के तर अमेरिकेत ११ टक्के आहे. भारतानेही बॅटरी निर्मिती व पुनर्वापराच्या क्षेत्रातील संशोधनावर पैसा खर्च करून पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बॅटरी पुनर्वापरामुळे पृथ्वीवरील कचरा तर कमी होईलच; शिवाय खनन करून हे धातू बाहेर काढताना होणारे कार्बन उत्सर्जनही झपाट्याने कमी होईल. यामुळे उपलब्ध होणारे साहित्य पुरवठा साखळीत समाविष्ट केल्यास त्याचा तुटवडा भासण्याची शक्यता कमी होऊन त्याची किंमतही नियंत्रणात राहील. भारतात किमान १ कोटी लोक प्रवासी आणि मालाच्या ने-आणीसाठी रिक्षा चालवितात. परिणामी देशात ई-रिक्षा उद्योगासाठी मोठी संधी आहे.

– **अनिल रा. तोरणे,** पुणे

# प्रायोगिक नाटकांचे मरण आपण पाहतो आहोत...!



आला आला म्हणता म्हणता एकांकिकांचा सिझन सुरू देखील झाला. मुंबईतील महत्त्वाच्या स्पर्धा सध्या पार पडताहेत. येत्या काही दिवसांत उरल्या सुरल्या पार पडतील. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधल्या तरुणाईचा जल्लोष प्रत्येक स्पर्धेसाठी चैतन्य निर्माण करून देणारा ठरतोय. त्यामुळे खुल्या गटाची कळी देखील खुलतेय. या एकांकिका स्पर्धांमध्ये कायम खुला गट आणि आंतरमहाविद्यालयीन अशा दोन विभागांमध्ये विभागली गेली आहे. कारण खुल्या गटातील स्पर्धक हे वयोमानाने मोठे असल्याने शिस्त आणि शिष्टाचार पाळणारे असतात. परीक्षा केंद्रावरील अविर्भावात प्रयोग सादरीकरणाच्या गंभीर वृत्तीने प्रत्येक स्पर्धेकडे पाहत असतात. साधारणतः खुल्या गटाला विविध वयोगटाचे कलाकार उपलब्ध होऊ शकतात मात्र आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी गटाला वयोमानाच्या सादरीकरणाला वयोमर्यादा येतात. कारण वृद्ध अथवा बाल कलाकाराची संहितेला गरज असल्यास कॉलेजमधल्या कुणा मुला/मुलीला ती व्यक्तिरेखा साकारणं भाग असतं. याउलट खुल्या गटातील एकांकिकांबद्दल म्हणता येईल. थोडक्यात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधल्या एकांकिका खुल्या स्पर्धेच्या तुलनेत कमी पडतात; परंतु आता महाविद्यालये आणि त्यांचे दिग्दर्शक यांनी एकांकिकांचे एक "स्पर्धात्मक समीकरण" तयार केले आहे आणि आज मी त्यावरच थोडे लिहिणार आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या अनुभवाचे हे एक पान म्हटले तरी चालेल.

सर्वप्रथम आपण एकांकिका म्हणजे नेमके काय हे पाहू. एका अंकात सामावलेल्या नाट्यास आपण एकांकिका म्हणतो. स्थलकालाच्या मर्यादित अवकाशात आपल्या सर्व नाट्यशक्ती एककेंद्रित करणारा; थोडक्यात उत्कट, एकसंघ व एकजिनसी परिणाम साधणारा संपूर्ण, स्वयंपूर्ण, एक अंकी नाट्यप्रकार म्हणजे एकांकिका. भरताने संस्कृत नाट्यशास्त्रात नाटकांचे दहा प्रकार सांगितले आहेत. त्यातले भाण, उत्सृष्टिकांक, व्यायोग आणि वीथी हे चार प्रकार एकांकिकांचे आहेत. याचा अर्थ, भरताच्या काळातही ही चार प्रकारची नाटके होत असावीत. स्थल-काल व कथानकाची एकता साधणाऱ्या, प्रभावी व्यक्तिरेखा असणाऱ्या व एकसंघ स्वरूपाच्या पाच स्वयंपूर्ण एकांकिका भास या नाटककाराने लिहिल्या आहेत. पण भासाला अनुसरून नंतरच्या नाटककारांनी अशा एकांकिका लिहून एक प्रवाही परंपरा निर्माण केल्याचे आढळत नाही. त्यानंतर, भारतामधल्या ब्रिटिश राजवटीच्या काळात मुख्यत्वे संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मयावरून स्फूर्ती घेऊन मराठी एकांकिका लिहिल्या गेल्या. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात मात्र हा नाट्यप्रकार मराठीत भरभराटीला आला. आज या नाट्यप्रकाराला निदान महाराष्ट्रात तरी भरपूर मागणी आहे. त्यामुळे लोकप्रियतेच्या बाबतीत एकांकिका हा नाट्यप्रकार अव्वल स्थानावर आहे.

एकांकिका सुमारे अर्ध्या ते पाऊण तासाची असते. ती बहुरूपिणी असते. तिला कोणत्याही विषयाचे वावडे नसल्याने ती काव्यमय, चर्चात्मक, प्रहसनासारखी, तत्त्वचिंतनपर किंवा रहस्यकथेसारखी असू शकते. एखाद-दुसरीच मध्यवर्ती व्यक्तिरेखा, अर्थभारीत आणि नाट्यगर्भ असे मोजके संवाद, तीव्र व उत्कट परिणाम साधणारे प्रसंग या सर्वांच्या साह्याने एकांकिका एकात्म परिणाम साधते. आजची मराठी एकांकिका ही एकप्रवेशी न राहता बहुप्रवेशी आणि बहुकेंद्री झाली आहे. मराठीतील सुरुवातीच्या एकांकिका या इंग्रजी एकांकिकांचे अनुवाद आणि रूपांतरे असत. उदा. इंग्रजी 'दि सीक्रेट'चा किरातांनी केलेला 'संशयी शिपाई' हा अनुवाद; 'दि डिअर डिपार्टेड' आणि 'कमिंग थ्रू द राय' या एकांकिकांची माधव मनोहर यांनी केलेली अनुक्रमे 'आजोबांच्या मुली' आणि 'जन्मापूर्वी' ही रूपांतरे. तसेच दिवाकरांचे 'आंधळे'(मूळ इंग्रजी लेखक-मेटरलिंक) वगैरे, राम गणेश गडकऱ्यांचे 'दीड पानी नाटक' ही बहुधा अनुवादित नसलेली स्वतंत्र एकांकिका असावी. पुढील काळात अनंत काणेकर, दत्तू बांदेकर, भा. वि. वरेरकर, मो. ग. रांगणेकर, व्यंकटेश वकील, शं. बा. शास्त्री इत्यादी लेखकांच्या एकांकिकाही प्रकाशित झाल्या.



भालचंद्र कुबल

पाचवा वेद

इ.स. १९५० मध्ये मुंबईतील भारतीय विद्याभवन या संस्थेने आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा घ्यावयास सुरुवात केली आणि मराठीत एकांकिका हा नाट्यप्रकार बहरास आला. मी मुद्दाम इथे २०२४ मध्ये घेतल्या जाणाऱ्या एकांकिका स्पर्धांची यादी देणार नाही कारण आजचा विषय आंतरमहाविद्यालयीन एकांकिकांचे परिवर्तन खुल्या वयोगटातील एकांकिकांमध्ये झाल्यावर त्यांचा दर्जा कमी झालेला आढळतो का? तर त्याचे उत्तर होय असेच आहे. उदाहरण म्हणून नुकतीच झालेली अमर हिंद मंडळाची एकांकिका स्पर्धा आंतरमहाविद्यालयीन आणि खुल्या गटातील स्पर्धकांचे छान मिश्रण होते. माझ्या मते महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांमधून हाताळल्या जाणाऱ्या विषयांबद्दल नक्कीच कौतूक आहे. भन्नाट विषयांशिवाय कदाचित कॉलेजमधील तरुण मंडळी एकांकिका करतच नसावेत. शिवाय मॉबसारखे सादरीकरणाचे हत्यार फक्त महाविद्यालयीन मंडळीच वापरू शकतात. आजकाल नॅक ॲक्रेडिएशन महाविद्यालयीन श्रेणी ठरवित असल्याने सांस्कृतिक कार्यावर विशेष लक्ष पुरवले जाते, त्यासाठीचा निधी पुरवला जातो. महाविद्यालयाचे नाव कसे होईल याची जणू चढाओढच लागलेली असते आणि तेच एकांकिका स्पर्धांच्या पथ्यावर पडले आहे. खुल्या वयोगटातील स्पर्धांमध्येसुद्धा आंतरमहाविद्यालयीन एकांकिकांचे वर्चस्व वाढू लागलेय; परंतु झगमगीत एकांकिकांच्या सादरीकरणाला न भुलता अगदी सर्वात पहिला जो वयोगटाचा मुद्दा मी मांडला होता, तो निकष लावल्याने अनेक महाविद्यालयीन एकांकिका अपयशही येते. त्यामानाने खुल्या गटातील हौशी मंडळी स्वतःची पदरमोड करून, ओळखी-पाळखीतल्या लेखकाची एखादी एकांकिका हौसे खातर करून आपला नाट्यकंड शमवताना आढळतात.

मी मुद्दाम एकांकिकेची व्याख्या या लेखात नमूद केली कारण याच नाट्यप्रकाराने मराठी नाटकात वेगवेगळे इझम्स जन्माला घातले, ज्या इझम्सने प्रायोगिक रंगभूमी घडवली. स्पर्धेच्या या प्रचंड गदारोळात स्पर्धांमधून निर्माण झालेली प्रायोगिकतेची तत्त्वे सांगणाऱ्या एकांकिका मात्र आपण गमावल्या आहेत. रुईयाची संसाराणू पेंडघर, रुपारेलची जागतिक शांतता दिन साजरा, चेतनाची डिक्टेटर, ज्ञानसाधनाची अश्वत्थाची मुळे, सिडनहॅमची कर्म, जे. जे. स्कूल आर्टची चौकोनातला त्रिकोण, सिद्धार्थची प्रिय गुरुजी सारखी खरीखुरी प्रायोगिकता जपणाऱ्या एकांकिका मात्र लोपल्या आहेत. त्यांची जागा चटपटीत विषय, नेत्रदीपक सादरीकरण आणि प्रेक्षकांना गुंतवून ठेवणाऱ्या लिखाणातील वेगाने व्यापली आहे. दुर्दैवाने त्याचेच अनुकरण मिनी स्वरूपात हौशी रंगभूमीवरील रंगकर्मी करताना आढळतात. हे असेच पुढील काही वर्षे तरी नक्की सुरू राहणार, स्पर्धात्मक नाटकच चढाओढ करत राहणार आणि नाटकातील प्रायोगिकता संपुष्टात येणार...! थोडक्यात आमची एकच पिढी अशी आहे जिच्या नशिबी प्रायोगिक नाटकाचा उदय, बहर आणि अस्त बघण्याचे दुर्भाग्य अनुभवायला लागणार आहे...!



# 'संत्रानगरी नागपूरमध्ये दिमाखदार दुसरे विदर्भ' लेखिका साहित्य संमेलन

"लेखिका मैत्रिणींनो समाजात वावरताना डोळे कायम उघडे ठेवा... कुठे काय चाललय... ते बघा. स्त्रियांचे प्रश्न आपल्या लिखाणातून मांडा... आपल्यासाठी कोणीतरी काही करेल... या भ्रमात राहून नका... म्हणून मला असं वाटतं की 'तुझी तूच शोध दिशा... इतरांच्या कुबड्यांची गरज तुला नाही'... हे सांगण्यासाठीच... स्त्री सुरक्षा, समस्या व उपाय या विषयाचा उहापोह व्हावा या दृष्टिकोनातून आहे 'मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठान' आणि 'सेवादल शिक्षण संस्था' यांच्या वतीने आयोजित केल्या गेलेले दुसरे विदर्भ लेखिका साहित्य संमेलन मला विशेष महत्त्वाचे वाटते. "असे उद्गार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष सुप्रसिद्ध कादंबरीकार विजयाताई ब्राह्मणकर यांनी काढले. यावेळी मंचावर उद्घाटक डॉ. मनीषा यमसनवार, प्रमुख अतिथी हेमांगीताई नेरकर, स्वागताध्यक्ष वृंदाताई संजय शेंडे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निरुपमा ढोबळे, सेवादल महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. सुशील मेश्राम आणि या साहित्य संमेलनाची धुरा आपल्या खांद्यावर सांभाळून असलेल्या 'मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठान'च्या अध्यक्ष प्रा. विजया मारोतकर उपस्थित होत्या. 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले परिसर' असे नाव देण्यात आलेल्या संमेलनाच्या या परिसरात विदर्भातील अकराही जिल्ह्यांमधून उपस्थित झालेल्या लेखिकांची मांदियाळी भरली होती. ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची सुरुवात झाली. "हे केवळ साहित्य संमेलन न राहता एक चळवळ झालेली आहे." असे मुख्य आयोजक विजया मारोतकर यांनी प्रास्ताविकातून प्रस्तुत केले. त्या म्हणाल्या "विदर्भाच्या अकराही जिल्ह्यांमध्ये तळागाळातील लिहित्या लेखिकांना बाहेर आणण्याचा आमचा मानस आहे. तिचं जगणं जगापुढे याव, याकरता अशा साहित्य संमेलनाची गरज आहे. यामुळे तिच्यात एक आत्मिक बळ येते आणि त्या सकारात्मक ऊर्जा तिच्या जगण्याला पुढे नेतात." कविवर्य आरती प्रभू यांच्या कन्या हेमांगी ताई नेरकर या प्रमुख पाहुण्या यांनी 'विदर्भाच्या मातीने मुंबईला साद घातली आणि हा दरवळ तिथपर्यंत आणला' याबद्दल आभार मानले. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील आदरणीय ज्येष्ठ कवयित्री मिराबाई ठाकरे यांना आधुनिक बहिणाबाई, तर गोंदिया जिल्ह्यातील ज्येष्ठ कवयित्री अंजनाबाई खुणे यांना झाडीपट्टीची बहिणाबाई म्हटले जाते. डॉ. जयश्रीताई पेंढारकर, जयश्रीताई रुईकर, अंजनाबाई खुणे आणि धनश्री लेकुरवाळे यांना 'विदर्भ स्त्री रत्न' पुरस्काराने पुरस्कृत केले गेले, तर साहित्य संमेलनाला समर्पित "विदर्भ शलाका" या विशेषांकासह पाच पुस्तकांचे प्रकाशन झाले. विदर्भातील लेखिकांच्या साहित्याबद्दल मला कुतूहल होते. म्हणून या संमेलनाला एक श्रोता म्हणून मी उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात "वैदर्भीय लेखिकांचे वैशिष्ट्यपूर्ण लेखन" हा परिसंवादाचा विषय होता. डॉ. भारती खापेकर यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या सत्राला डॉ. मंदा नांदूरकर, अमरावती या प्रमुख अतिथी होत्या. या सत्रामध्ये पद्मिनी घोसेकर यांनी आहारशास्त्राचे लेखन करणारे लेखिका डॉ. जयश्री पेंढारकर, डॉ. सीमा अतुल पांडे, डॉ. विद्या ठवकर यासारख्या लेखिकांच्या लेखनाची दखल घेतली. डॉ. वैशाली कोटंबे, अकोला यांनी बोलीभाषेचे वैशिष्ट्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखिका उषा किरण अत्राम, अंजनाबाई खुणे यांचा उल्लेख केला. उज्ज्वला पाटील यांनी सामाजिक परिवर्तनाचे भान ठेवत लेखन करणाऱ्या लेखिका, संमेलनाच्या अध्यक्ष, अशा विजयाताई ब्राह्मणकर यांचा उल्लेख केला, तर समाजात परिवर्तन घडवण्याकरता 'पोरी जरा जपून'चा ध्वज घेऊन धावणाऱ्या प्रा. विजया मारोतकर यांच्या साहित्यिक वाटचालीचा परामर्श घेतला. विमलताई देशमुख यांसारख्या व्यक्तिमत्त्वावर लेखन करणाऱ्या डॉ. मंदाताई नांदुरकर यांच्या लेखनाचा विशेष उल्लेख झाला.





फिरता फिरता

मेघना साने

आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या जाणीवेतून, विदर्भातील ज्येष्ठ व सुप्रसिद्ध कवयित्री आदरणीय विजयाताई मारोतकर यांनी विदर्भातील लेखिकांना एकत्रित केले. अकरा जिल्ह्याचे अकरा समूह करून दर गुरुवारी प्रत्येक समूहावर 'सावित्रीचा वसा'हा काव्यलेखनाचा उपक्रम २१ आठवडे राबविला. या उपक्रमामुळे अनेक कवयित्री लिहित्य झाल्या. सर्वानुमते वैदर्भीय कवयित्रींचा 'काव्यवसा'हा प्रतिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित केला. निशा डांगे यांनी विदर्भातील कवयित्रींनी निर्माण केलेल्या "काव्यवसा" चा संदर्भ घेत त्यांच्या काव्य लेखनाची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी केली, तर डॉ. सुनंदा जुलमे यांनी लेखनाशिवाय विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या लेखिकांच्या कार्याचा उल्लेख केला. या संमेलनाचे विशेष आकर्षण असलेले "बाई पण भारी देवा" हे कविसंमेलन अध्यक्ष विजयाताई कडू यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाले. कवयित्री पल्लवी परुळेकर, मुंबई या प्रमुख अतिथी म्हणून मंचावर उपस्थित होत्या. बाईच्या जगण्याचे विविध पदर उलगडत एकापेक्षा एक दमदार काव्य ३० कवयित्रींनी आपल्या कवितांमधून सादर केले. संध्याकाळी गझल मुशायरा, कवी संमेलन, कथाकथन असेही कार्यक्रम या संमेलनात होते. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात "कौतुकाची पहिली थाप" हा परिसंवादाचा विषय होता. या सत्राच्या अध्यक्ष स्मिताताई गोळे अध्यक्ष भाषण करताना म्हणाल्या की, "लेखिकांनो आपल्या सगळ्यांना कौतुक जरूर हवं असतं; परंतु आपण साहित्यिक कवयित्री आहोत याचे भान ठेवा. कथा, कविता चोरू नका. अन्यथा कौतुक होत नाही. आजकाल शीर्षकेही चोरली जातात. तेव्हा असा प्रकार करून मिळवलेले कौतुक चिरकाल टिकत नसते." अशी तंबीही दिली. दोन दिवस चाललेल्या 'दुसरे विदर्भ लेखिका साहित्य संमेलना'च्या समारोप सत्राचे अध्यक्षपद आदिवासी साहित्याच्या अभ्यासक उषाकिरण अत्राम यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्या म्हणाल्या की, "फार काळ महिलांनी आपले दुःख काळजात लपवून ठेवले. ते दुःख साहित्य रूपाने पुढे येत आहे. हे संमेलन त्याची दखल घेत आहे. मी आता लेखणीची मशाल हाती घेतली आहे. सख्यांनो ... तुम्हीही मशाल हाती घेऊन आकाश उजळून टाका". संमेलनाध्यक्ष विजया ब्राह्मणकर यांनी संमेलनाचा आढावा घेत विदर्भाची लेखणी बळकट करण्याचे आव्हान केले.


meghanasane@
gmail.com



# हरवलेल्या आवाजातून नव्याने गवसलेली 'कविता'...!



रंगमंचावरचे कलावंत आणि गायक मंडळी यांच्यासाठी स्वतःचा 'आवाज' हा अतिशय महत्त्वाचा असतो. मात्र ऐन भरात असताना हाच आवाज जर त्यातल्या एखाद्याला सोडून गेला, तर काय होऊ शकते; याचे एक उदाहरण या क्षेत्रात कायम झाले आहे. युवा गायिका व अभिनेत्री कविता जोशी हिच्या बाबतीत अचानक एक विचित्र घटना घडली. तिचा 'आवाज'च एकदा हरवला; पण त्यानंतर मात्र तिच्यातल्या सकारात्मक ऊर्जेद्वारे तिने जे जे काही केले; त्यातून नाट्य व संगीतक्षेत्राला आता नव्याने गवसलेली 'कविता' पाहायला मिळत आहे. तिच्याशी संवाद साधताना तिच्या 'त्या' घटनेविषयीच्या भावना कविता व्यक्त करत होती; तेव्हा तिच्या स्वरांतून एका वेगळ्याच आवाजाची चाहूल लागत होती. कविता म्हणते,"आधी मला वाटत होते की माझा आवाज हरवलाय. पण हळूहळू जाणीव होत गेली की माझे बरेचकाही हरवले होते. कदाचित मीच हरवले होते. स्वतःपासून दूर गेले होते. भरकटले होते. पण आत्मविश्वास परत मिळवता मिळवता, मी आत्मशोधाच्या मार्गावर कधी आले ते मलाच कळले नाही. आत्मशोधाच्या मार्गावर माझा प्रवास सुरू व्हावा, आत्मशोधाची तृष्णा माझ्या मनात निर्माण व्हावी; म्हणूनच, तर माझा आत्मविश्वास हरवला नव्हता ना? आत्मशोध घेत राहणे हेच माझे उद्दिष्ट असेल का? तसे असेल, तर हा शोध असाच चालू राहणार. कारण मला मिळालेला मनुष्यजन्म ही एक संधी आहे; 'कोहं'पासून 'सोहं'पर्यंत पोहोचण्याची...!"

आवाज म्हणजे कविताचा सखा-सोबती! त्याच जोरावर तिने अनेक गाण्यांच्या, एकपात्री अभिनयाच्या आणि वक्तृत्व स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवली. ठिकठिकाणी गाण्यांचे कार्यक्रम केले. 'आकाशवाणी'वर अनेक कौटुंबिक श्रुतिका, मालिकांतून स्वराभिनय केला. अनेक हौशी, व्यावसायिक नाटकांत अभिनय केला. या सगळ्यात तिला तिच्या आवाजाची सतत सोबत होती. यथावकाश तिचे लग्न झाले, गोड मुलगी झाली. तिला गाणी म्हणून दाखवताना, गोष्टी सांगताना तिचा आवाज तिच्यासोबत होता. पण एकदा अचानक कविताच्या घशात वेदना सुरू झाल्या आणि तिला गाता येईनासे झाले. अवघ्या दोन महिन्यांत वेदना इतक्या वाढल्या की तिला एक अक्षरही बोलता येईना. दवाखान्याच्या वाऱ्या सुरू झाल्या. अनेक टेस्ट झाल्या आणि 'सिंगर्स नोड्यूल'चे निदान झाले. डॉक्टरांनी फर्मान सोडले की आता आवाजाला पूर्णतः आराम द्यायचा. पण दोन वर्षांच्या मुलीला सांभाळताना 'व्हॉइस रेस्ट' शक्यच नव्हती. वर्ष उलटले तरी तिला सलग पाच ते सात मिनिटेही बोलता येत नव्हते.

हा सगळा अवघड प्रकार विशद करताना कविता सांगते, "काही काळ नवऱ्याच्या कामानिमित्त आम्ही कॅलिफोर्नियात स्थलांतरीत झालो. आई-बाबा, गुरुजी पं. अरुण कशाळकर, मित्र-मैत्रिणी या सर्वांपासून आपण दुरावल्याची जाणीव होत होती. गाण्यापासूनही दुरावले होते. माझ्या आधीच्या आवाजाशी तुलना करण्यासाठी म्हणून मी अनेकदा स्वर लावून बघत असे. पण आवाजाचा पोत पूर्णतः बदलला होता. स्वर ३ पट्ट्या खाली गेला होता. मला माझा असा आवाज आवडेनासा झाला. माझ्या आशा मावळल्या होत्या. माझ्या मनात प्रश्नांचे काहूर माजले. हे काय होतेय आपल्याला? अनेक साध्या साध्या गोष्टींची आपल्याला भीती का वाटत आहे? हळूहळू लक्षात यायला लागले की 'सिंगर्स नोड्यूल'चा परिणाम केवळ माझ्या आवाजावरच नाही; तर माझ्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर झाला होता. माझा आवाज माझे सर्वस्व होता. तोच हातातून निसटल्यामुळे मी आत्मविश्वास गमावून बसले होते. नैराश्य आले होते. काय करावे ते कळत नव्हते. पण माझ्यातल्या भीतीला सामोरे जाण्यावाचून गत्यंतर नाही हे लक्षात आले. मग मी नव्याने गाडी शिकायला सुरुवात केली. पोहायला शिकले आणि पोहण्याच्या तीन शैली आत्मसात केल्या. यामुळे थोडा हुरूप आला. पुस्तकाची काही पाने स्वराभिनय करत मोठ्याने वाचायला सुरुवात केली. भारतात परत आले तेव्हा गाण्यापासून निर्माण झालेला दुरावा मिटवून गुरुजींना भेटायला गेले. त्यांच्या पाया पडले आणि माझ्या अश्रूचा बांध फुटला. इतकी वर्षे साचलेले काहीतरी वाहून गेले. सुरुवातीचे काही महिने फक्त सात-आठ मिनिटे सलग रियाज करू शकत होते. यानंतर थेट ९ वर्षांनंतर रसिकांसमोर, गुरुजींसमोर गायन सेवा अर्पण केली. तो आनंद शब्दातीत होता. माझा आवाज, माझा सखा पुन्हा माझ्याबरोबर होता. आता पुढच्या प्रवासात त्याची सोबत मला मिळणार होती. इथे पुन्हा आल्यावर एकांकिका स्पर्धांत सहभागी झाले. त्यातला अभिनय पाहून 'जन्मवारी' या नाटकात काम करायला मिळाले आणि मी पुन्हा एकदा व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवले. त्यात दोन गाणी म्हणण्याचीही मला संधी मिळाली. या नाटकातल्या भूमिकेसाठी माझे खूप कौतुक झाले आणि माझ्या आवाजाची 'वारी' नव्याने सुरू झाली".



राजरंग

राज चिंचणकर

# 'वर्तुलम' डॉ. किशू पालचा अभिनव नृत्याविष्कार

सुप्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक स्व. सुबल सरकार यांची कन्या नृत्य गुरू डॉ. किशू पाल यांनी नृत्यालिका प्रतिष्ठानच्या भरत नाट्यमच्या शिष्यांना घेऊन 'वर्तुलम' हा कार्यक्रम निर्माण व दिग्दर्शित कला आहे. त्यांचे शालेय शिक्षण परळच्या आर. एम. भट शाळेतून झाले. बालपणापासून त्यांना नृत्याची आवड होती. त्या कॉलेजमध्ये असताना वडिलांना नृत्य दिग्दर्शनात सहाय्य करायच्या; परंतु वडिलांनी त्यांना नृत्याचे प्रशिक्षण घेण्याचा सल्ला दिला. प्रसिद्ध नृत्यकार वेणू गोपाल पिल्ले यांच्याकडे त्यांनी भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेतले. मराठी चित्रपटसृष्टीत लावणीला खऱ्या अर्थाने ओळख सुबलजीनी दिली. लोकनृत्य व शास्त्रीयनृत्य त्यांनी सुबलजीकडून शिकल्या.

डॉक्टर व्यंकटेशराव यांच्याकडून हैदराबाद येथे कुचीपुडी नृत्य शिकल्या. रुईया कॉलेज व कीर्ती कॉलेजमधून त्यांचे पुढील शिक्षण झाले. नृत्यालिका ही नृत्यसंस्था त्यांनी स्थापन केली. 'अस्मिता महाराष्ट्राची' हा कार्यक्रम त्यांनी सुरू केला, त्यामध्ये १२ महिन्यांचे १२ सण त्यांनी सादर केले. त्याचे भरपूर प्रयोग झाले. नंतर त्यांनी पी. एच. डी. केली. त्यात त्यांचा विषय होता भारतीय नृत्योका सांस्कृतिक अनुशीलन. भरतनाट्यमवर दोन पुस्तकेदेखील त्यांनी लिहिली आहेत. ऊर्जा हा कार्यक्रम त्यांनी एनसीपीएमध्ये केला. त्यामध्ये वेगवेगळ्या नृत्य शैलीतील पारंगत नृत्यकाराला बोलावले होते. उदा.भरतनाट्यममधील सुधा चंद्रन, कथ्थक मधील मयूर वैद्य यांसारखे विख्यात नृत्य काराला प्रथमच त्यांनी एकत्र आणले होते. हा कार्यक्रम खूप गाजला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदीतील प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद यांनी केले होते.



टर्निंग पॉइंट

युवराज अवसरमल

"वर्तुलम 'हा सध्या कार्यक्रम खूप गाजतोय. तो त्यांच्या आयुष्यातील मोठा टर्निंग पॉइंट आहे असे त्या मानतात. माणसाचा जन्म ते अंत हा प्रवास त्यांनी नृत्यातून या कार्यक्रमात दाखविला आहे. भारतीय नृत्यनाट्याचे जनक कै. उदय शंकर यांनी लोकनृत्य, शास्त्रीय व उपशास्त्रीय नृत्य यांचा संगम करून एक नवा नृत्याविष्कार आणला होता, तो म्हणजे मुक्त नृत्य शैली. उदय शंकर यांच्या नंतर ही शैली त्यांचे शिष्य कै. सचिन शंकर आणि त्यांच्या नंतर त्यांचे शिष्य कै. सुबल सरकार यांनी जपली. आता सुबल सरकार यांची कन्या नृत्यगुरू डॉ. किशू पाल यांनी या नृत्य शैलीची जपवणूक करण्यासाठी 'वर्तुलम' हा कार्यक्रम आपल्या नृत्यलिका संस्थेतील भरतनाट्यमच्या शिष्यांना घेऊन निर्मित व दिग्दर्शित केला आहे. माणसाचा जन्म ते मृत्यू हे एक वर्तुळ असतं. या कालचक्रात तो नाना अवस्थेमधून जात असतो. बाल्य, किशोरावस्था, तारुण्य, मध्यवयीन गृहस्थ आणि नंतर वार्धक्य. या अवस्थांमधून जात असताना त्याने भोगलेले दुःखाचे व सुखाचे क्षण आपल्यासमोर नृत्यातून सादर होत असतात आणि शब्दांचा वापर न करता केवळ पार्श्वसंगीतावर कलाकारांच्या नृत्यविभ्रमातून कथा साकारत असते. ही सर्व सामान्य माणसांची कथा आहे. शेवटी माणूस संपतो आणि नंतर त्याचा पुनर्जन्म होतो. अश्या तऱ्हेने या माणसांच्या पिढ्यान् पिढ्या पुढे जात आहेत हेही नृत्यातून दर्शविले आहे. त्यांना दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांनी हाच 'सूनबाईचा भाऊ' या चित्रपटासाठी स्वतंत्रपणे नृत्य दिग्दर्शन करण्याची संधी दिली. त्यांच्या नृत्यालीका संस्थेच्या भारतभर व भारताबाहेर शाखा आहेत. शास्त्रीय कला सगळ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. नंतर त्यांनी परंपरा हा कार्यक्रम केला होता. त्यामध्ये त्या, त्यांचे वडील व मुलगा अशा तीन पिढीने नृत्य साकारले होते. 'आठवणीतले दादा ' हा एक टॉक शो त्यांनी केला होता. मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंत कलावंतांनी कै. सुबल सरकारांच्या सहवासातील आठवणी सांगितल्या. वर्तुलम एक अभिनव नृत्याविष्कार हा कार्यक्रम सगळ्यांपर्यंत पोहोचावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यांना भावी वाटचालीसाठी व वर्तुलम कार्यक्रमासाठी हार्दिक शुभेच्छा!



# 'गुलाबी'चे टायटल साँग उलगडणार मैत्रीचा रंग

बहुप्रतीक्षित 'गुलाबी' या चित्रपटाचे टायटल साँग नुकतेच प्रदर्शित झाले असून गुलाबी शहरातील म्हणजेच जयपूरमधील तीन मैत्रिणींची धमाल यात अनुभवायला मिळते. अश्विनी भावे, मृणाल कुलकर्णी आणि श्रुती मराठे यांच्यावर चित्रपट करण्यात आलेल्या हा उत्स्फूर्त गाण्याला साई-पियुष यांचे संगीत लाभले असून मंदार चोळकर यांच्या लेखणीतून साकारलेले हे गाणे हंसिका अय्यर यांनी गायले आहे. मैत्री, स्वप्नं आणि स्वतःचा शोध घेणाऱ्या तिघींचा प्रवास या गाण्यातून उलगडत आहे. तिघींची बहरत जाणारी मैत्री यात दिसत असतानाच जयपूरचे रंगीबेरंगी सौंदर्यही यात अधिक रंगत आणत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक अभ्यंग कुवळेकर म्हणतात,



गुलाबी चित्रपटाचं टायटल साँग म्हणजेच या तीन स्त्रियांच्या आयुष्यातील आनंद आणि मोकळेपणाचं प्रतीक असल्याचे म्हटले. या गाण्याच्या माध्यमातून मैत्री, स्वातंत्र्य, आणि स्वप्नं यांचा एक सुसंवाद प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. पिंक सिटीमध्ये घडणाऱ्या या कथेत प्रेक्षकांना जीवनातील विविध रंग अनुभवायला मिळतील. व्हायोलेट फ्लेम मोशन पिक्चर्स प्रस्तूत आणि सोनाली शिवणीकर यांची निर्मिती असून अभ्यंग कुवळेकर दिग्दर्शित हा चित्रपट २२ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# गेवराईत निवडणूक वातावरण तापले!

बैठक — अण्णासाहेब राठोडांनी विधानसभेचा अर्ज भरावा

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई विधानसभेचे राजकारण सध्या अनेक जणांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर तापल्याचे पाहायला मिळत आहे. अपक्ष, बंडाळी, पक्षप्रवेश, हालचाली इतर गोष्टींना वेग आला आहे. लोकसभा निवडणुकीत अण्णासाहेब राठोड यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या पक्षा साठी जिवाचे रान करत बजरंग सोनवणे यांना ३९ हजारांची गेवराई विधानसभा मतदारसंघातून लीड दिली होती. याचा फायदा विधानसभेला होईल अशी आशा तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांना होती. गेवराई विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी पक्षाची असून शरदचंद्रजी पवार साहेबांनी ही जागा राष्ट्रवादी पक्षालाच ठेवावी अशी मागणी अण्णासाहेब राठोड यांनी लोकसभा निवडणूक झाल्यापासून शरदचंद्रजी पवार यांना केली आहे. गेवराई मतदार संघातून फक्त शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादीचाच उमेदवार विजयी होऊ शकतो हे भविष्य काळातील सत्य त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे. यासाठी गेवराई विधानसभेची पूर्वीची जागा जशास तशीच ठेवून ती राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवाराला देण्यात यावी अशी आग्रही मागणी केली परंतु याला महाविकास आघाडीच्या माध्यमातून बगल देत ती जागा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला देण्यात आली. यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असून नवखा व उमदा उमेदवार शरद पवार देतील अशी आशा सर्वांना असताना निराशा झाली. तळागाळातील गोरगरीब जनतेच्या पान २ वर...



## दोन दिवसात निर्णय: अण्णासाहेब राठोड

गेवराई विधानसभा मतदारसंघाची जागा राष्ट्रवादीला मिळावी यासाठी अनेक वेळा शरद पवार यांना वेळोवेळी भेटून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला महाविकास आघाडी मधून जागा सोडून घेण्यात यावी अशी मागणी केली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे, बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांना भेटून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची हक्काची जागा राष्ट्रवादीलाच ठेवावी अशी मागणी केली पण या मागणीला अपयश आले. त्यामुळे आपण निवडणूक लढवावी अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली.

## पंडित-पवार सोडून पर्याय

बैठकीदरम्यान अनेक कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडले अनेक जणांना अश्रू कोसळले गेल्या साठ वर्षापासून गेवराई मतदार संघामध्ये पंडित किंवा पवार यांचेच साम्राज्य आहे हे मोडीत काढण्यासाठी शांत स्वभावाचे व समाजकार्यात, गोरगरिबांसाठी अग्रेसर असणारे अण्णासाहेब राठोड हेच एकमेव पर्याय आहे हेच पंडित पवारांना रोखू शकतात अशा घोषणा यावेळी कार्यकर्त्यांनी दिल्या व अण्णासाहेब तुम्ही विधानसभेचा फॉर्म भरा ही भेदरलेली जनता तुम्हाला आमदार करेल असे यावेळी अनेक जणांनी विचार मांडले

# कडा येथे पोलिसांचे पथसंचलन!

अलर्ट: सामाजिक हालचालींवर पोलिसांचे लक्ष



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिपोत्सव आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आष्टी पोलीस ठाण्यांतर्गत आष्टी, कडा शिराळ इत्यादी या ठिकाणी पोलिसांचे पथसंचलन झाले .

याबाबत अधिक माहिती अशी की पुढील आठवड्यापासून दिवाळी सणाला सुरुवात होत आहे. त्याचप्रमाणे सध्या विधानसभा निवडणुकीचे रणधुमाळी सुरू आहे. या दोन्हीच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांच्या वतीने पथसंचालनाचे आयोजन करण्यात येते. पान २ वर...

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत कुणीही शांततेला गालबोट लावण्याचा प्रकार किंवा कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास पोलिस प्रशासनाकडून गय केली जाणार नाही. असा इशारा देतानाच, या कालावधीत सोशल मिडियावरही पोलिसांचे विशेष बारकाईने लक्ष असणार आहे.

-शरद भूतेकर, पोनि आष्टी

# पार्डीकर महाविद्यालयात ग्रीन क्लब

धोरण:स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वी

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालयात ग्रीन क्लब समिती व व्यावसायिक समुपदेशन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने ग्रीन क्लबचे उद्घाटन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व आजचा युवक या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. के.के. पाटील, प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनंत जाधव, विशेष उपस्थिती म्हणून डॉ. एच.पी. कदम डॉ. जी .व्ही .गट्टी व ग्रीन क्लबचे समन्वयक डॉ. जयदीप सोळुंके हे व्यासपीठावर होते. सर्वप्रथम पंडित गुरु पार्डीकर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व रोपट्यास जल अर्पण करून ग्रीन क्लबचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांचा यथोचित



सत्कार झाल्याच्या नंतर स्पर्धा परीक्षा व आजचा युवक या विषयावर डॉ.अनंत जाधव यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या युगामध्ये टिकायचे असेल तर महाविद्यालयातील शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षेचे अध्ययन करणे ही काळाची गरज आहे .अशा पद्धतीचे मत त्यांनी व्यक्त केले .ग्रीन क्लब च्या माध्यमातून महाविद्यालय परिसर हरित करणे पान २ वर...

# जरांगे पाटलांना भेटल्याने वातावरण टाईट

शिवराज पवार: आण्णांना विजय करण्यासाठी कामाला लागावे

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदारसंघातील संघातील जनतेने आमदार लक्ष्मण आण्णांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत दहा वर्ष सेवा करण्याची संधी दिली त्या संधीचे आण्णांनी सोन करून मतदारसंघात गाव तिथे रस्ता करत दळणवळण सुकर केले तसेच अनेक गावांत जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक बंधारे बांधून जलसिंचन करण्याचे काम केले आहे .तर गोरगरीब लोकांना आपल्या हाक्काचे राशन मिळावे म्हणून प्रशासकीयस्तरावर सातत्याने प्रयत्न करत राशन वितरण व्यवस्था सुरळीत करून आज मतदारसंघातील प्रत्येक कार्ड धारकांना हाक्काचे राशन मिळत आहे त्यामुळे जनतेने पुन्हा आग्रह करत आ.लक्ष्मण आण्णांना विधानसभा निवडणुकीत उभा केले आहे तरी आण्णांना



निवडून आण्ण्यासाठी सर्व कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी बैठकी दरम्यान बोलतांना केले आहे

विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी तसेच निवडणूक जिंकण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या संपर्क कार्यालयात युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत आज २६ रोजी सकाळी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारसंघात दहा वर्षांत केलेले काम जनतेत पर्यंत गेले पाहिजे यासाठी प्रत्येकांनी गावागावात चर्चा करून भविष्यातील उर्वरित विकास काम करण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या विजयासाठी कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बैठकी दरम्यान केले आहे यावेळी दादासाहेब गिरी,मधुकर वादे,ब्रम्हदेव धुरंधरे,संजय इगळे,कानगुडे आप्पासाहेब, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, विठ्ठल मोटे,मुन्ना शेठ, जुनेद बागवान, अनिल आप्पा शेट्टे, रशीद बागवान, सचिन वावरे,बद्दोदिन, पिटु साळवे, लक्ष्मण खरात, बाबा खरात, दशरथ पंडीत, करण जाधव, आदी उपस्थित होते मतदारसंघात गेली काही दिवसा पासुन पान २ वर...

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सरपंच सेनेत

पक्षांतर: सरपंच संतोष हातागळेंचा शिवसेनेत प्रवेश



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चव्हाणवाडी येथील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सरपंच संतोष हातागळे यांचा लोकनेते बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांनी भगवे रुमाल घालून स्वागत केले यावेळी प्रवेश करते शहादेव हातागळे,भगवान हातागळे,बाबुराव हातागळे ,अच्युत हातागळे,ओमकार चौधरी लक्ष्मण हाणगे,महादेव हातागळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला या वेळी काशिनाथ आडागळे, कैलास मामा राठोड , सुनील कांडेकर , श्रीमंत यादव, भुजंग शेळके आदी उपस्थित होते.

# खेवरे किंवा कदमांनी विधानसभा लढवावी

तनपुरे : राहुरी तालुका विकास मंडळचा निर्णय

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी आगामी विधानसभेला राहुरी मतदारसंघातुन विकास मंडळाच्या माध्यमातून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पै रावसाहेब खेवरे किंवा मा नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी लढण्याचा निर्णय घेतला तर राहुरी तालुका विकास मंडळ पुर्ण ताकदीने व एक संघपणे पक्षीय भेद बाजूला ठेवून त्यांचा मागे उभे राहील असे प्रतिपादन राहुरी तालुका विकास मंडळाचे सर्वेसर्वा रावसाहेब चाचा तनपुरे यांनी केले आहे

राहुरी येथ राहुरी तालुका विकास मंडळाचा कार्यकर्ता संवाद मेळावा घेण्यात आला त्याला संबोधित करताना तनपुरे बोलत होते ते पुढे म्हणाले की विकास मंडळाने सर्वसामान्य पान २ वर...



# महाराष्ट्राला संत परंपरेचा वारसा!

समारंभ:क्षेत्र आळंदीत गुणगौरव सोहळा



वडवणी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठा महासंघ व जगद्गुरु तुकाराम महाराज सामाजिक अध्यात्मिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने वारकरी सांप्रदायातील संत महंत महाराष्ट्रातील वारकरी शिक्षण संस्थेची कार्य करणाऱ्या महाराज मंडळींचे संत पूजन तथा गुणगौरव सोहळा २६ डिसेंबर २०२४ रोजी निश्चित करण्यात आला असून कार्यक्रमाचे स्थळ श्री ज्ञानेश्वर मंदिर श्री गोविंद महाराज केंद्रे संस्था आळंदी निश्चित झाला आहे.त्या स्थळाची पाहणी करत असताना मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय दिलीप दादा जगताप तसेच वारकरी संप्रदायाचे थोर मार्गदर्शन श्री ह भ प चैतन्य महाराज कबीर, श्री गु.कुंभार *गुरुजी वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री ह भ प पंडित महाराज क्षीरसागर आध्यात्मिक समन्वय आघाडी प्रदेशाध्यक्ष श्री संजय भाऊ घुंडरे पाटील श्री सरस्वती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री ह भ प रामेश्वर महाराज ढाकणे श्री बालासाहेब मोहिते पाटील नाना प्रतिष्ठानचे बब्रुवहान शेंडगे पाटील मराठा पान २ वर...

# प्रथमच मिळाली जिल्हाध्यक्षपदाची संधी

निवड:जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपाचे तत्कालिन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे या रिक्त पदावर कुणाची वर्णी लागणार याची उत्सुकता असतानाच कडा येथील भाजपाचे निष्ठावंत शंकर देशमुख यांची भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देशमुख यांना बीड जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारीचे शनिवारी पत्र दिले. देशमुख यांच्या निवडीबद्दल कडा शहरात फटाक्यांची अतिषबाजी करुन समर्थकांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

आष्टी तालुक्यातील कडा येथील शंकर अनंतराव देशमुख हे भारतीय जनता पार्टीचे विद्यमान बीड जिल्हा सरचिटणीस म्हणून कार्यरत होते. तसेच माजीमंत्री पंकजा मुंडे, प्रीतम मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख आहे. आष्टीकरांना पहिल्यांदाच भाजपा जिल्हाध्यक्ष पदाची संधी मिळाल्याने सर्वस्तरातून देशमुख यांचे अभिनंदन होत आहे.

ऋणानुबंध — प्राथमिक आरोग्य केंद्रात ६६ रक्तदात्यांचे रक्तदान

# दिंद्रुडमध्ये निरंकारी मंडळाकडून रक्तदान

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन द्वारा संचलित निरंकारी मंडळाच्या वतीने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात काल दि.२६ ऑक्टोबर शनिवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात रक्ताचा तुटवडा असल्यामुळे येथील ब्लड बँकने आव्हान केल्यानंतर संत निरंकारी मंडळाने रक्तदात्यांकडून रक्तदान करून घेतले.

या रक्तदान शिबाराचे उद्घाटन दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पत्रकार नागेश वकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश ढाकणे, डॉ. शेख,



ग्रा.पं. सदस्य नारायण चांदबोधले, शंकर यादव, अंबाजोगाई ब्लड बँक टीम, ग्रामस्थ, आदि उपस्थित होते. या शिबिराला योगदान देण्यासाठी दिंद्रुड, नागपिंपरी, गुंज, उमरा, सिरसाळा, काडीवडगाव येथील सेवेकर्यांनी योगदान देत एकूण ६६ रक्तदात्यांनी आपले रक्त दान केले. रक्त नाल्यात नव्हे तर रक्त नाडीत वहावे हे ब्रीदवाक्य घेऊन संत निरंकारी मंडळ प्रतिवर्षी सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करतात. शिबिरात रक्तदात्यांना बिस्किट, चहा व नाश्त्याची व्यवस्था मंडळाच्या वतीने करण्यात आली होती. अंबाजोगाई स्वाराती रुग्णालयातील ब्लड बँकेच्या वतीने डॉ. वैभव देशमुख, डॉ. मधुकर गावीत, अनंत शिताफ, वाल्मीक कांबळे, प्रणव मंत्री, बाळासाहेब यादव आदिंनी रक्त डोनेशन पान २ वर...

# विधानसभा निवडणुकांसाठी पोलीस अलर्ट

प्रशासन:पोलिसांचा तगडा बंदोबस्त

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील दोन विधानसभा मतदार संघाचा केवळ ३ अधिकारी व १९ पोलीस कर्मचारी व १८ गृहरक्षक दलाच्या जवानांवर बंदोबस्ताचा ताण आला आहे सोयगाव पोलीस ठाण्यात रिक्त पोलीस कर्मचाऱ्यांअभावी कन्नड आणि सिल्लोड या दोन्ही मतदार संघाच्या निवडणुकीची जबाबदारी स्थानिक १९ पोलीस व तीन अधिकाऱ्यांवर आहे...

आगामी महिन्यात दिवाळी सण आणि लोकशाहीचा उत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विधानसभा निवडणुका हे दोन महत्वाचे उत्सव आहे या उत्सवात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये म्हणून पोलीस हा महत्वाचा दुवा मानला जातो दिवाळी सणात व निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या सुट्या रद्द करण्यात आलेल्या आहे दिवाळी सणाच्या कालावधीत पोलिसांना डोळ्यात तेल घालून रस्त्यावर बंदोबस्त करण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आले आहे त्यानंतर लगेच विधानसभा निवडणूका ची रणधुमाळी सुरू होणार आहे परंतु ५३ गावांची हद्द असलेल्या सोयगाव पोलीस ठाण्यात केवळ १९ कर्मचारी व तीन अधिकारी कार्यरत आहे त्यामुळे या तुटपुंज्या कर्मचाऱ्यांवर निवडणुका आणि दिवाळीच्या सणांचा बंदोबस्ताची धुरा आहे दरम्यान पान २ वर...




विधानसभा निवडणुकीसाठी एक सीमा सुरक्षा दलाची तुकडी बंदोबस्त साठी देण्यात आली आहे परंतु ही तुकडी सिल्लोडलाच असते त्यामुळे सोयगाव साठी या विशेष बंदोबस्त चा कोणताही फायदा नाही.